# आमच्या विभागातील बालशिक्षणाची काही खास वैशिष्ट्ये

बालशिक्षण
नव्या दृष्टीतून
मुलांच्या
सहजशिक्षणाचा
बालशिक्षणात
अभ्यासपूर्वक समावेश





समृध्द्
बालशिक्षणासाठी
'काको' उपक्रम-
घर व शाळा यांची
भक्कम जोडणी

अनुभवाधारित
आनंददायी
कृतीयुक्त
खेळपध्दतीचा
प्रभावी वापर






मुलांच्या
दृक् साक्षरतेला
पूर्ण वाव देणारा
अक्षर ओळखीचा
एक नवा प्रवास

'कला नव्हे तर
मुलांची आकलन
प्रक्रिया' या विचाराने
मुलांच्या चित्रांबाबत
काम



सरस्वती मंदिर ट्रस्ट
पूर्व प्राथमिक शाळा

NCERT तर्फे Innovative Practices चे
राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त,
पदम्भूषण ताराबाई मोडक विशेष संस्था
पुरस्कार प्राप्त
आणि
खेळ पध्दती व नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी
राष्ट्रीय स्तरावर कौतुक पात्र

**सरस्वती मंदिर ट्रस्ट**

## पूर्व प्राथमिक विभाग

महात्मा गांधी मार्ग, नौपाडा, ठाणे.
smtpps123@gmail.com

### शाळा - पालक

# संवाद पुस्तिका

संकल्पना व लेखन : मुख्याध्यापिका रती भोसेकर

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार

पायाभूत टप्पा -(३ ते ८ वयोगट)
शाळेतील त्यानुसारची रचना

— पायाभूत टप्पा १ —
किलबिल घर (मिनी शिशु ): वयोगट- ३ ते ४ वर्ष

— पायाभूत टप्पा २ —
फूलघर (लहान गट): वयोगट - ४ ते ५ वर्ष

— पायाभूत टप्पा ३ —
फळघर (मोठा गट): वयोगट - ५ ते ६ वर्ष

# सरस्वती मंदिर ट्रस्ट, ठाणे - स्थापना - १९५२

शाळेची
जुनी इमारत





शाळेची
नवी इमारत

१९५२ मध्ये उगम पावलेली शिक्षणाची ही गंगोत्री ज्ञानधारा बनली.

## संस्थापिका व विश्वस्त



कै.मा.श्रीमती.विमलाताई कर्वेबाई

## संस्थापक



कै.मा.डॉ.चिं.श्री.कर्वे

## संस्थापक



कै.मा.श्री.ग.ना.गाजरे

## कार्यकारी विश्वस्त



मा.श्री.सुरेंद्र दिघे

## विश्वस्त मंडळ



श्री.पुरुषोत्तम आगवण



श्री.विकास दामले



ॲड.अनुराधा आपटे



श्री.सुनील जोशी



श्री.दिपक ओक

# सरस्वती मंदिर ट्रस्ट, विद्यासंकुल
## नौपाडा, ठाणे




| | | |
|---|---|---|
| सरस्वतीय सूत्र | - | नेटकेपणा, प्रामाणिकपणा आणि सर्वोत्तमाचा ध्यास |
| सरस्वतीय व्रत | - | विद्‌यार्थ्यांना सर्वार्थाने सबल, सक्षम आणि समृध्द बनविण्यासाठी उच्चतम गुणवत्तेची शैक्षणिक व्यवस्था निर्माण करणे. |
| सरस्वतीय आकांक्षा | - | सर्वार्थाने उच्चतम शिक्षण देणारी जागतिक दर्जाची शिक्षणसंस्था होणे. |

**संस्थेचे विविध विभाग**

१. सरस्वती मंदिर प्राथमिक विभाग - १९५२
२. सरस्वती मंदिर ट्रस्ट पूर्व प्राथमिक विभाग - १९५५
३. सरस्वती सेकंडरी स्कूल - १९६६
४. सरस्वती क्रीडा व विज्ञान सांस्कृतिक केंद्र - १९९८
५. सरस्वती CBSE शाळा २०१६
६. सरस्वती प्रज्ञा भाषा केंद्र - २००५
७. सरस्वती कला अकादमी - २०२१

# सरस्वती मंदिर ट्रस्ट
# पूर्व प्राथमिक विभाग, ठाणे





★आमचे ब्रीदवाक्य★

**हासती मुले जिथे, देश तो महान**



★आमचे ध्येय★

**आनंदी ठेवू मुले**



★आमचे बोधचिन्ह★








**★आमचा विश्वास★**

**मुलांचे सहज शिक्षण**

**हेच त्यांचे खरे बालशिक्षण**

**★आमचा अभिमान★**

**बालशिक्षणातील**

**नवी दिशा नवा विचार**



**★आमच्या सक्षम बालशिक्षणासाठी★**

**पायाभूत टप्प्यात समाज आणि**

**पालकांचा सक्रिय सहभाग**





# ★ आमच्या विभागातील बालशिक्षणाची वैशिष्ट्ये ★

**१**. मुलांच्या **सहजशिक्षणाचा बालशिक्षणात अभ्यासपूर्वक समावेश** करुन पायाभूत टप्प्यातील बालशिक्षणाची नवी रचना, त्यानुसार विभागामध्ये **दोन प्रकारच्या खेळपध्दतींचा** समावेश असलेले वर्ग -

१.१ **शैक्षणिक कृती वर्ग** - वर्गताईने तयार केलेले शैक्षणिक खेळ वर्ग (विविध संकल्पनानुसार)

१.२ **सहजशिक्षण वर्ग** - मुलांचे स्वतःचे खेळ (आजूबाजूचे जग समजून घेतानाचे खेळ)वर्ग .

**२**.कामाच्या वर्गात तयार खेळण्यांच्या ऐवजी मुलांनी विविध साहित्यातून **स्वतः तयार केलेल्या साधनांमधून 'मुलांच्या शिकणे' या प्रकियेला वाव.**

**३**.शैक्षणिक कृती वर्गात मुलांमधील विविध क्षमतांच्या विकासासाठी **भरपूर शैक्षणिक साधनांचा** वापर.

**४.मुलांची चित्र** - कला नाही तर जग समजून घेण्याचे माध्यम समजून मुलांच्या चित्रांवर काम

**५.मुलांचे खेळ** - फावल्या वेळातील गोष्ट नाही तर **'मुलांचे जगणे हेच त्यांचे खेळणे'** आणि **'मुलांचे खेळणे हेच त्यांचे शिकणे'** या विचारातून 'मुलांच्या खेळ प्रक्रियेचा'मोठ्यांकडून अभ्यास.

**६**.मुलांचे सहज शिक्षण, त्यातील त्यांचे खेळ, खेळणी व मुलांची चित्र याविषयी **पालकांशी सुसंवाद व पालकांमध्ये जागरुकता.**

**७.माझे मूल, माझी समज** - पालक जागरुकता गटातील मुलांना समजून घेण्याचे पालकांचे भरीव काम.

**८.पालकांसमवेत आम्ही** - या संकल्पनेनुसार पालकांना पायाभूत टप्प्यातील विविध उपक्रमांत सहभागी करुन घेणे.

**९.घराघरात बालवाडी - कामाचा कोपरा** - या उपक्रमांतर्गत पालकांशी बालशिक्षणातील खेळपध्द्ती व त्यातील खेळ यांवर सुसंवाद करुन घराघरात समृध्द **'कामाचा कोपरा'** तयार करुन बालवाडी फुलवली जाते.

**१०**.पूर्व प्राथमिक ते प्राथमिक विभाग - **मुलांचे सुकर संक्रमण**

# ★ आमचे साध्य ★

## पायाभूत टप्प्यातील मुलांच्या विकासक्षेत्रांचा समग्र विकास

अन्नमय आणि प्राणमय कोश - शारीरिक विकास

सूक्ष्म व स्थूल स्नायू विकास



# सरस्वती मंदिर ट्रस्ट
# पूर्व प्राथमिक विभाग
## पायाभूत टप्पा (वयोगट ३ ते ८ वर्ष)

### पायाभूत टप्पा - १
किलबिल घर (मिनी शिशू) वयोगट - ३ ते ४ वर्ष

**वेळ - सकाळी ९.०० ते १२.००**

### पायाभूत टप्पा - २
फूलघर (लहान गट) वयोगट - ४ ते ५ वर्ष

**वेळ - सकाळी ९.०० ते १२.१०**

### पायाभूत टप्पा - ३
फळघर (मोठा गट) वयोगट - ५ ते ६ वर्ष

**वेळ - दुपारी १२.१५ ते ४.१०**

★ मुख्याध्यापक भेटीची वेळ : सोमवार ते शनिवार सकाळी ११.३० ते १२.३०

★ शिक्षक भेटीची वेळ : शनिवार सकाळी ९.३० ते १०.३०

# शाळेचे नियम

१) एका आठवडयापेक्षा अधिक काळ बालक अनुपस्थित राहणार असल्यास शाळेला तसे लेखी कळवावे. एक महिना न कळविता बालक अनुपस्थित राहिल्यास त्याचे नाव शाळेतून कमी करण्यात येईल.

२) कोणत्याही प्रकारचे मौल्यवान दागिने घालून बालकास शाळेत पाठवू नये.

३) बालकास शाळेत वेळेच्या फक्त १० मिनिटे आधी सोडावे व शाळा सुटल्यावर १० मिनिटांच्या आत घेऊन जावे. अन्यथा दंड आकारला जाईल .

४) बालकाला व त्याच्या बास्केटला बॅज लावणे अत्यावश्यक आहे.

५) गट प्रतिनिधींच्या सूचना पाळाव्यात.

६) पूर्व प्राथमिक विभागासाठी गणवेश नाही. बालकास सुटसुटीत कपडे घालावेत.

७) शाळा भरण्यापूर्वी किंवा भरल्यानंतर कोणत्याही कारणास्तव परस्पर पाल्याच्या वर्गात जावू नये.

८) शाळा भरल्यानंतर मुख्याध्यापकांच्या परवानगीशिवाय वर्गशिक्षिकेशी संपर्क साधू नये.

९) केवळ शाळा सुटल्यावरच वर्गशिक्षिकेशी संपर्क साधता येईल, ह्याची नोंद घ्यावी.

# मुलांबरोबर पाठवायच्या वस्तू

१) नमुन्याप्रमाणे बॅजसह बास्केट (नमुना बास्केट शाळेच्या पहिल्या दिवशी दाखवली जाते).

२) सहज उघडणारा डबा (फक्त शाकाहारी पदार्थांसह).

सोमवार ते गुरुवार - पोळी भाजी (सदृश्य), शुक्रवार - खाऊ.

३) पाण्याची बाटली व हातरुमाल.

४) फळघरासाठी (मोठा गट) दोन शिसपेन्सिली, खोडरबर व स्पंज पेटी पाऊचमध्ये पाठवावे.

५) वर्गताईने आवश्यकतेनुसार वॉट्स ॲप गटावर सांगितलेले शाळेत पाठवायचे साहित्य, आपल्या पाल्याचे नाव व हजेरी क्रमांक लिहून शाळेत पाठवावे.

# शालेय उपक्रम माहिती

**१) बालवाचनालय** - मुलांच्या वाढदिवसानिमित्त मिळालेल्या पुस्तक भेटीतून एक बालवाचनालय शाळेत वर्गावर्गात चालवले जाते. त्यानुसार दर आठवड्याला मुलांना आपल्या आवडीचे एक पुस्तक घरी नेता येते. बालवयातच मुलांना पुस्तकांची गोडी निर्माण व्हावी यासाठी हा प्रयत्न आहे. पालकांनी मुलांना पुस्तकातील गोष्टी चित्रासह वाचून दाखवाव्यात हा त्यामागचा उद्देश आहे. वाचून झालेले पुस्तक विलंब न करता आठवड्याने वर्गशिक्षिकेकडे व्यवस्थित आणून द्यायचे असते.

**२) आजी-आजोबा दिन - स्नेहबंध** : पालकांच्या पालकांना शाळेत सामावून घेणारा हा कार्यक्रम आहे.

**३) शाळेतील आजोळ** : शाळेच्या सुरुवातीच्या दिवसात मुलांना शाळेत रुळण्यासाठी इच्छुक आजी-आजोबांचा सहभाग घेऊन शाळेत आजोळ तयार करण्यात येते.

**४) पालक स्नेहसंमेलन** : पालकांच्या विचारांना, कलागुणांना वाव देणारा कार्यक्रम आयोजित केला जातो.

**५) मुलांना अनुभवसंपन्न करण्याच्या अनुषंगाने विविध प्रकल्प व क्षेत्रभेटींचे आयोजन केले जाते.**

**६) एक मूठ कर्तव्याची** : मुलाच्या वाढदिवसानिमित्त शाळेमध्ये एक मूठ धान्य (डाळ किंवा तांदूळ) जमा करण्याचे आवाहन केले जाते. जमा झालेले धान्य गरजूंना दिले जाते.

**७) आमचा डबा** : पूर्व प्राथमिक विभागाच्या अनेक उद्दिष्टांपैकी एक उद्दिष्ट मुलांच्या पोषणमूल्ययुक्त आहाराचा पाया रचणे हे आहे. याच अनुषंगाने विभागामध्ये आमचा डबा हा प्रकल्प राबविला जातो.पालकांना मुलांना पौष्टिक पदार्थ खाण्याच्या सवयी लावण्यासाठी मदत करणे हा या प्रकल्पाचा मुख्य हेतू आहे. तसेच पालकांच्या बाहेरचे पदार्थ खाण्याच्या वाढत्या सवयीला आळा घालणे हाही एक उद्देश आहे. या प्रकल्पाअंतर्गत वर्गशिक्षिका रोज मुलांच्या डब्यातील पदार्थांची नोंद ठेवते. तर मोठा गट म्हणजेच फळघरामध्ये मुले स्वतः आपल्या डब्यातील पदार्थांची नोंद करतात. यानुसार पालकांना त्यांनी पाठविलेल्या डब्याचे म्हणजेच पदार्थांचे मूल्य कळवले जाते. तसेच खाऊची जत्रा, आहारतज्ज्ञांचे मार्गदर्शन वगैरे

# शालेय उपक्रम माहिती

उपक्रमांचे आयोजन केले जाते. प्रत्येक सत्राच्या शेवटी पालकांना त्यांनी त्या सत्रात पाठविलेल्या डब्यातील पदार्थांचे प्रगती पुस्तक मिळते.

८) **बनी टमटोला** : भारत स्काऊट आणि गाईड तर्फे राबविण्यात येणारा बनी टमटोला हा उपक्रम (३ ते ६ वयोगट) विभागासाठी आयोजित केला जातो. मुलांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण करणारे विविध उपक्रम या अंतर्गत संपन्न होतात.

९) **आमची शाळा, आमची पुस्तके** : शाळेसाठी पालक, वर्गताई व मुले मिळून विविध संकल्पनेनुसारची पुस्तके स्वतः तयार करतात.

**१०) काको उपक्रम** : घर व शाळा यांना जोडणारा व पालकांचे सक्षम बालशिक्षण करुन घराघरात बालवाडी फुलवणारा 'कामाचा कोपरा' उपक्रम केला जातो.

**११) पूर्व प्राथमिक ते प्राथमिक मुलांचे सुकर संक्रमण** : पायाभूत टप्पा ३-फळघर मोठ्या गटामध्ये पाल्य अवलोकनामध्ये पालक व प्राथमिक शिक्षकांचा सहभाग घेऊन मुलांचा क्षमता अहवाल प्राथमिकला सादर केला जातो. तसेच ज्या मुलांना क्षमता विकासासाठी मदतीची आवश्यकता असते, त्या मुलांच्या पालकांना विविध शैक्षणिक व इतर कृतींसाठी मार्गदर्शन केले जाते. जेणेकरुन पूर्व प्राथमिकच्या अनौपचारिक शिक्षण पध्दतीतून प्राथमिकच्या औपचारिक शिक्षण पध्दतीत मुलांचे संक्रमण सुकर होईल.

# 'काको उपक्रम'

## मुलांचा काको - 'कामाचा कोपरा  उपक्रम माहिती'

मुलांसाठी बालशिक्षणाचं सुंदर विश्व घराघरात फुलविण्यासाठी आपल्या विभागात एक खास **काको** (कामाचा कोपरा) **उपक्रम** राबवला जातो. त्यानुसार दर आठवड्याला वर्गताई पालकांना वॉट्सॲप गटावर काही कामं (शैक्षणिक खेळ) सांगेल  ती पालकांनी मुलांच्या कलेने  घरी करण्यास द्यावी. त्यासाठी घराचा एक कोपरा ठरवूया म्हणजेच तो मुलांचा **काको** (कामाचा कोपरा) असेल. तिथे ते काम करण्यास ठेऊन देऊया. काही दिवसांनी मुलांना तो कोपरा व त्यात आज काय काम करायला ठेवलं आहे याबद्दल उत्सुकता दिसायला लागेल किंवा काही कामं इतरत्रही होतील. मुलांना इतर ठिकाणी जाऊन कामं करायची असतील तर त्यास बंधन मात्र अजिबात नको. त्यावेळी त्यांचा **काको** त्यांना ठरवू द्या. प्रत्येक दिवशीचा त्यांनी ठरविलेला **काको** कदाचित वेगवेगळा असेल, त्यांना ती मोकळीक आहे. तसेच पालकांनी फक्त त्या कामासाठी आवश्यक साहित्य मुलांना घरात शोधून घ्यायला सांगा किंवा उपलब्ध करुन द्या व **काकोमध्ये** झालेले काम ठेवण्यास सांगा. मात्र काम कसे करावे याबद्दल सुचना न देण्याची खबरदारी घ्यावी. अशाप्रकारे आपल्या मुलांसाठीचा बालशिक्षणाचा समृध्द प्रवास हा पालक व वर्गताई यांच्या संवादातून होईल. पूर्व प्राथमिकच्या उद्दिष्टांपैकी एक उद्दिष्ट मुलांच्या शिक्षणासाठी पालक व समाज यांचा सहभाग घेणे हे आहे. त्यामुळे आपण सगळे मिळून बालशिक्षणाच्या या सुंदर प्रवासास तयार होऊया आणि शाळेच्या मदतीने बालशिक्षणाचे प्रशिक्षण घेऊन घराघरात बालवाडी फुलवूया.






# वर्षभरातील विभागाच्या पालकसभा

★ **वर्गवार एकत्रित -** वर्गातील सर्व मुलांच्या पालकांची एकत्रित पालकसभा संबंधित वर्गात घेण्यात येते.

★ **पाल्य अवलोकनसभा -** ही सभा फक्त किलबिल घरासाठी (पायाभूत टप्पा १) आयोजित केली जाते. आपल्या पाल्याचा विकास कसा होत आहे याचा प्रत्यक्ष अनुभव देणारी पाल्य अवलोकन सभा ही अत्यंत महत्त्वाची आहे. या सभेसाठी पाल्यासह दिलेल्या वेळेनुसार शाळेत उपस्थित राहणे अनिवार्य असते.

★ **वर्गवार क्रमवार पालकसभा -** ही सभा फूलघर (पायाभूत टप्पा २) व फळघर (पायाभूत टप्पा ३) साठी आयोजित केली जाते. हजेरी क्रमांकानुसार दोन गटांमध्ये पालकसभा संबंधित वर्गात घेण्यात येते. पालकांनी पाल्यासह या सभेस उपस्थित राहणे अनिवार्य असते.

# वर्ग WhatsApp गट

प्रत्येक वर्गाचे WhatsApp गट तयार केले आहेत. ते फक्त शैक्षणिक कारणासाठीच वापरणार आहोत. त्यावरुन वर्गताई शाळेतील उपक्रमांविषयी, पालकसभांविषयी व शाळेत पाठवायच्या साहित्याविषयी एक आठवडा आधी संवाद साधेल. तसेच या गटावर दर आठवड्याला १ किंवा २ शैक्षणिक खेळ पाठवण्यात येतील. याच गटामार्फत घरातील 'काको - कामाचा कोपरा' याविषयी वर्गताई संवाद साधून तो कसा तयार करायचा याचे मार्गदर्शन देईल.

# पालकांशी संवाद

प्रिय पालक मित्र-मैत्रिणींनो

नमस्कार,

NCERT तर्फे आयोजित राष्ट्रस्तरावरील स्पर्धेत पुरस्कार प्राप्त असा हा आपला पूर्व प्राथमिक विभाग आहे. तसेच पूर्व प्राथमिक व प्राथमिक स्तरावर विशेष कार्य करण्याबद्दल आपल्या संस्थेला पद्मभूषण ताराबाई मोडक विशेष संस्था पुरस्कार मिळाला आहे. राज्य व राष्ट्र स्तरावर ठसा उमटवणाऱ्या आपल्या पूर्व प्राथमिक विभागातील मुलांसाठी अंमलात येणाऱ्या शिक्षण प्रक्रियेविषयी हा संवाद! शिकणे ही मुलाची सहज प्रवृत्ती असते. मूल जन्मल्यापासून आपल्या ज्ञानेंद्रियांमार्फत आपल्या आजूबाजूच्या जगाशी नाते जोडत शिकत असते. त्याबाबत आपल्या जाणिवा जागृत करत असते. आपल्या असे लक्षात येईल की, तीन वर्षांचे मूल कुणीही काहीही न शिकवता अनेक गोष्टी आपल्या आपण करत असते. ही आपलं आपण शिकण्याची क्षमता मुलांकडे नैसर्गिकपणे असते. खेळ ही मुलाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे आणि त्यामुळे मूल हे सगळे आपल्या खेळातून सहज साध्य करत असते. मुलाला येणारे अनुभव खेळ माध्यमातून मांडून, मुलाच्या ज्ञानाची घडण होत जाते. म्हणजेच अनुभव व खेळ हे नाते जोडून मूल शिकू पाहते. अगदी हाच धागा पकडून आपल्या पूर्व प्राथमिक विभागात बालशिक्षणाचा पाया खेळपध्द्ती व अनुभवाधारित शिक्षण यावर रचला जातो. मुलांच्या खेळातूनच त्यांचा सर्वांगीण विकास साध्य केला जातो. तसंच त्यांचे अनुभवविश्व संपन्न करण्यासाठी समाज आणि पालक यांच्या सहकार्याने अनेक उपक्रमांचे आयोजन केले जाते. मुलांच्या विचारशक्तीला चालना मिळावी, त्यांची सृजनशीलता बहरावी, स्वयंकृतीतून स्वयंशिक्षणाला वाव मिळावा यासाठी मोकळे वातावरण देण्यात येते. म्हणजेच मूल या नैसर्गिक घटकाला नैसर्गिकरित्या घडविण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. पण यासाठी शाळेला आपली साथ महत्त्वाची आहे. त्याचबरोबर त्यासाठी बालशिक्षण (मुलांसाठी जाणिवपूर्वक आयोजित केलेला क्षमताविकास कार्यक्रम) आणि सहजशिक्षण (मुलांची शिकण्याची नैसर्गिक क्षमता) यांतील फरक समजून घेऊया व त्यां दोघांची विभागामध्ये गुंफण कशी घातली जाते हेही बघूया.

# बालशिक्षण म्हणजे नेमके काय ?

★ बालशिक्षण हा पूर्णपणे मुलांना केंद्रबिंदू मानून आखलेला कार्यक्रम असतो.

★ ३ ते ६ वयोगटातील मुलांसाठी समृध्द् अनुभव देणारा असा कार्यक्रम असतो.

★ या कार्यक्रमात पूर्णपणे खेळपध्द्ती व कृतीयुक्त अनुभव यांचा समावेश असतो.

★ मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी हा तयार केलेला असतो.

★ या कार्यक्रमात पूर्णपणे खेळातून मुलांचा भाषा विकास, बौध्दिक विकास, शारीरिक विकास, भावनिक व सामाजिक विकास साध्य केला जातो.

★ मुलांचा लिहिणे, वाचणे, अंक ओळख यासारख्या समाजमान्य शिक्षणाचा पाया रचला जातो.

★ हा एक पूर्णपणे नियोजनबध्द परंतु तरीही मुलांच्या क्षमतेनुसार लवचिक असा कार्यक्रम असतो.

★ शाळा, पालक व संस्था अशा तिघांच्या समन्वयाने व संवादाने मुलांसाठी आखलेला कार्यक्रम असे याचे वर्णन करता येते.

★ हा कार्यक्रम स्वयंकृतीने स्वयंशिक्षणावर विश्वास ठेवणारा असतो.

★ मूल, त्यांना मिळणारे अनुभव, त्यातून त्यांना मिळणारा आनंद हेच ध्येय ठेवून तो आखलेला असतो.

# बालशिक्षणाची ध्येय व उद्दिष्टे

## ध्येय

१. मुलांच्या आजीवन शिक्षणप्रक्रियेचा व सर्वांगीण विकासाचा पाया रचणे.

२. मुलांना औपचारिक शिक्षणासाठी तयार करणे.

## उद्दिष्टे

१. प्रत्येक मुलाला आपण महत्त्वाचे आहोत व आपल्याला मान दिला जात आहे, असे वाटणारे वातावरण निर्माण करणे.

२. या वातावरणात त्याला अतिशय सुरक्षित व संरक्षित वाटेल याची काळजी घेणे.

३. मुलामध्ये स्वतःविषयी सकारात्मक भावना वाढीस लागेल असे वातावरण निर्माण करणे.

४. स्वस्थ व निरोगी जीवन, चांगल्या सवयी, पोषणयुक्त आहार व स्वच्छता यांचा भक्कम पाया रचणे.

५. मुलांना उत्तम संवादक होण्यास मदत करणे.

६. मुलांची दुसऱ्याचे बोलणे समजून घेण्याची व स्वतः व्यक्त होण्याची क्षमता विकसित करणे.

७ मुलांचे व्यक्तिमत्त्व सहभागाने काम करणारे व बारकाईने विचार करणारे होईल हे पाहणे.

८. तसेच मुलांचे व्यक्तिमत्त्व आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीला जुळवून घेणारे आणि सर्जनशील असे विकसित करण्यास मदत करणे.

९. मुलांचे पूर्व प्राथमिक मधून प्राथमिक मध्ये सहज संक्रमण करणे.

१०.मुलांचे व्यक्तिमत्त्व पूर्णत्वाने बहरण्यासाठी, सक्षम होण्यासाठी पालक व समाज यांना बरोबर घेऊन काम करणे.

# आता सहजशिक्षण समजून घेऊया !

## सहजशिक्षण - विचार

१. मूल हा निसर्गाचा एक भाग आहे. निसर्ग नियमाप्रमाणे त्याची वाढ आणि विकास होत असतात. या त्याच्या नैसर्गिक वाढीला आणि विकासाला वाव देऊया.

२. मुलांच्या क्षमतांवर विश्वास ठेवूया.

३. मुलाला आपला परिसर समजून घ्यायचा असतो. त्यात घडत असलेल्या गोष्टी समजून घ्यायच्या असतात. त्यासाठी त्याला सुरक्षित वातावरण, मोकळेपणा आणि स्वातंत्र्य देऊया.

४. मुलाला नेहमी सन्मानाने वागवूया. त्याचे प्रदर्शन न करता त्याच्या स्वतंत्र व्यक्ती असण्याचा आदर ठेवूया

५. सतत त्याचे फोटो काढणे, कौतुक करत रहाणे हे टाळूया. मुलांना कौतुकाची गरज नसते ती आपण त्यांना लावतो हे जाणून घेऊया.

६. मुले खेळत असतात तेव्हा त्यांनी परिसराचा घेतलेला अनुभव ती या खेळात परत परत जगून बघत असतात. त्यांच्या पध्दतीने परिसराची आपली समज बनवत असतात. त्यासाठी त्यांना कुठल्याही तयार खेळण्यांची गरज नसते हे सत्य समजून घेऊया.

७. खरं म्हणजे तयार खेळणी मुलांच्या एकूण विकासासाठी घातक असतात. मुले खेळत असताना जर काही वस्तू लागली, तर ती स्वतः बनवून घेतात. ही त्यांच्यासाठी सहज प्रक्रिया असते. खेळून झाल्यावर या वस्तूचे खेळणे म्हणून अस्तित्व संपते. म्हणजे मुलांच्या या आकलन प्रक्रियेत खेळण्यांना क्षणिक महत्त्व आहे.

८.मुलांना नेहमी प्रक्रियेत रहायचे असते. त्यांना अंतिम गोष्ठीत रस नसतो.

९. मुलांच्या जगण्याचे शिकणं, खेळणं व इतर असे भाग नसतात.

१०. मुलांच जगणं हेच शिकणं असतं हे समजून घेऊया.

११. शिक्षणाची प्रक्रिया जन्मल्यापासूनच सुरु होते. त्यामुळे शिक्षण फक्त शाळेतच होते, हा समज चुकीचा आहे हे जाणून घेऊया.

१२. लेखन व वाचन ही कौशल्ये संवादासाठी आवश्यक आहेत, ते म्हणजे शिक्षण नाही हे समजून घेऊया.

# जरा विचार करुया.

## वय वर्ष ३ ते १६ प्रवास ....

तुम्ही जेंव्हा बालवाडी किंवा पहिलीतल्या मुलांशी बोलता, तेंव्हा तुम्हाला प्रचंड उत्सुकता असलेली मुलं-मुली भेटतात. ते अत्यंत उत्सुकपणे अत्यंत खोल आणि विचार करायला लावणारे प्रश्न विचारतात.

ते विचारतात, ‘स्वप्ने म्हणजे काय, आपल्याला टाचा का असतात,

चंद्र गोल का असतो, जगाचा वाढदिवस कधी असतो, गवत हिरवं का असतं ’

हे खरंतर अत्यंत प्रगल्भ आणि महत्वाचे प्रश्न असतात. अन ही चिमुरडी पोरं हे प्रश्न बुडबुडे फुटल्यासारखे सहज आणि धडाधड विचारत असतात.

मग तुम्ही बारावीच्या मुलांशी बोलता. त्यांना असले काहीही प्रश्न पडत नसतात, ते विचारत नसतात. ते जगाच्या बाबतीत संपूर्णपणे अनुत्सुक बनलेले असतात.

बालवडी ते बारावीच्या दरम्यान काहीतरी भीषण घडलेलं असतं.

**-कार्ल सेगन, अंतराळ वैज्ञानिक.**

## हे होऊ नये म्हणून आम्ही

मुलांच्या सहजशिक्षणाचा (Natural Learning) बालशिक्षणात गांभिर्याने विचार करतो. मुलांचे सहज शिकणे आणि बालशिक्षण यांची भक्कम जोडणी करतो. शैक्षणिक कृतीवर्ग आणि सहजशिक्षण वर्ग (कामाचा वर्ग) यांचा सुरेख मेळ घालतो.

**शैक्षणिक कृतीवर्ग**



**सहजशिक्षण वर्ग (कामाचा वर्ग)**



# शाळा आणि सहजशिक्षण यांचा मेळ घालताना

 

**शाळेत खेळ पध्दती दोन प्रकारे हाताळली जाते -**

**१. शैक्षणिक कृतीवर्ग -** मुलांच्या नियोजित विकासासाठी वर्गताईने विविध संकल्पनांनुसारचे खेळ घेणे.

**२. सहजशिक्षण वर्ग (कामाचा वर्ग) -** मुलांच्या खेळांचे अवलोकन करणे आणि त्यातून मूल काय समजून घेत आहे हे पहाणे.

यानुसार **पहिल्या प्रकारात** म्हणजेच **शैक्षणिक कृतीवर्गात** -

१. मुलांना सतत शैक्षणिक कृती करायला देतो.

२. भरपूर शैक्षणिक खेळ हाताळायला देतो.

३. त्यातूनच त्यांच्या विविध संकल्पना विकसित होतील हे पहातो.

४. विविध खेळ घेतो, मुलांच्या हालचालींना मोकळीक मिळेल असे वर्ग वातावरण तयार करतो.

५. वेगवेगळे उपक्रम घेतो, जसं रंगसप्ताह, आकारसप्ताह.

६. मुलांच्या त्या संकल्पना आनंददायी पध्दतीनेच विकसित होतील हे पहातो.

७. एकूण मूलकेंद्री शिक्षणाची वाटचाल करतो.

# ELPS प्रक्रियेतून शिक्षक मुलांना नेतो.

**E -** **अनुभव**
***experience*** with physical objects.

**L -** **अनुभव संभाषणातून व्यक्त करणे.**
spoken ***language*** that describes the experience.

**P -** **चित्रांतून व्यक्त करणे.**
***pictures*** that describes the experience.

**S -** **त्यांच्या अनुभवांना शब्दबध्द करणे.**
written ***symbols*** that generalize the experience.

**तसेच या शैक्षणिक कृतीवर्गामध्ये मोठे ठरवतात -**

★ मुलांना काय कृती करायला द्यायच्या.

★ त्यांचा त्या कृतीतून कोणता विकास झाला पाहिजे.

★ त्यातून त्यांना कोणती मजा येईल.

परंतु यामध्ये **मुलांनी काय शिकायचे हे मुलांनी काही कृती करण्याआधीच ठरवलेले असते.** या प्रकारात मुलांचे कृतीयुक्त शिक्षण होईल व हेच त्यांचे अनुभवाधारीत शिक्षण आहे असे मोठ्याना वाटते.त्यात खालील विचारांना वाव नसतो -

★ मुलांना स्वतःला काय काय करुन पहायचे आहे.

★ मुलांना स्वतःला काय शिकायचं आहे.

★ मुलांना स्वतःला कोणत्या कृती करायच्या आहेत.

★ मुलांना स्वतःला कोणते अनुभव घ्यायचे आहेत.

★ मुलांना स्वतःला काय जाणून घ्यायचं आहे.

**तर,**

**दुसऱ्या प्रकारच्या खेळ पध्दतीत,म्हणजेच सहजशिक्षण वर्गात (कामाच्या वर्गात) मुलांच्या सहजशिक्षणाला वाव देण्यासाठी मुलांच्या खेळ या प्रक्रियेचा अभ्यास केला जातो. ज्याला मुलांची कामे असे म्हटले जाते. या मुलांच्या कामांमधून मूल का शिकते, काय शिकते आणि कसं शिकते  याचा अभ्यास करत आम्ही त्यांचे शिकणे टिपत जातो.**

# सहजशिक्षण वर्ग (कामाचा वर्ग)

## यासाठी विविध प्रकारचे साहित्य वेगवेगळ्या ठिकाणी ठेवले जाते.






## वेगवेगळ्या वस्तूंचे अन्वेषण, चर्चा करुन रचना व नव निर्मितीस वाव मिळेल असे वातावरण तयार केले जाते.





• या सहजशिक्षण वर्गात म्हणजेच कामाच्या वर्गात कृती नियोजन, काय करायचे व कसे करायचे, साहित्यावरुन निर्णय घेणे,एकमेकांना सहकार्य करणे, या सर्व गोष्टी मुलेच आपली आपण ठरवताना दिसतात. मोठे फक्त निरीक्षण आणि नोंदी ठेवतात.

• **कामाच्या वर्गाची रचना -**

★ शालेय **शैक्षणिक कृतीवर्ग** रचना विचलित होत नाही.

★ प्रत्येक वर्गातील मुले आठवड्यातील एक संपूर्ण दिवस कामाच्या वर्गात असतात.

★ दर आठवड्याला सगळे वर्ग व त्यातील सगळी मुले या वर्गात येतील असे नियोजन केले जाते.

## कामाच्या वर्गात सहजशिक्षणाला ( मुलांच्या स्वतःच्या खेळाला ) वाव दिल्यामुळे हे होते -

★ मुलांना आपले काम आपण करायचे हे माहित होते - दरवेळी शिक्षकांना सांगणे/विचारणे बंद होत जाते.

★ दुसऱ्याने काही सांगितल्याशिवाय करायचेच नाही - यापासून सुटका - ‘आम्ही आता काय करु’ या प्रश्नातून सुटका झालेली दिसते.

★ मुलांच्या कृतीत स्वयंशिस्त आल्यामुळे आणि त्यांना हवे तेच काम करत असल्याने नीट बसून करा हे सांगण्याची गरज भासत नाही.



★ ‘शिक्षकाची मर्यादा ही मुलांची मर्यादा’यातून सुटका होते.

★ मुले मोकळीक दिली की काय अफाट करु शकतात याचा साक्षात्कार होतो.

★ भाषाविकास, बौध्दिक विकास, सामाजिक व भावनिक विकास समग्रपणे दिसून येतो.

★ वाचन क्षमतेत वाढ झालेली दिसते.

## कामाच्या वर्गात - ELPS ही संपूर्ण प्रक्रिया - मुलांकडूनच होते.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ELPS ➡ | प्रत्यक्ष वस्तूंमधून अनुभव घेणे ➡ | संभाषणातून व्यक्त करणे ➡ | चित्रांतून व्यक्त करणे ➡ | त्यांच्या अनुभवांना शब्दबध्द करणे |
| | (E) | (L) | (P) | (S) |

## ★ मुलाच्या विकासाचे विविध टप्पे न पाडता समग्रता येते



## ★ तसेच जीवनाच्या शाळेचे प्रगतीपुस्तक - जीवन मूल्ये आत्मसात झालेली दिसतात




## यासाठी पालक सहभाग आणि संवाद अशाप्रकारे होतो.

★ मुलांच्या सहजशिक्षण वर्गातील कृतींचा अभ्यास करुन, पालकसंवाद आयोजित केले जातात.

★ पालकांना मुलांचे कामाच्या वर्गातले व्हिडीओ दाखवले जातात व त्यावर चर्चा होतात.

★ पालकांना स्वतःला घरी अशी निरीक्षणे नोंदवण्यास सांगितले जाते.

★ घर आणि शाळा यात समन्वय साधला जातो.

★ त्यांच्या घरचे नको असलेले साहित्य या वर्गासाठी देण्याची विनंती केली जाते. मात्र त्यात तयार खेळणी अजिबात नसतात.

★ काही विशेष साहित्य हवे असेल तर त्यासाठी विनंती केली जाते.

★ इच्छूक पालकांचे 'आपलं मूल आपली समज' असे मूल समजून घेण्याचे पालक अभ्यासगट तयार केले जातात.

★ पालकांचे पालक म्हणजेच जेष्ठ पालक यांच्याशीही मुलाच्या सहज शिक्षणाबाबत संवाद साधला जातो.

# एकूण सहजशिक्षणातून काय साध्य होते तर...

★ सहज शिक्षणातून मूल जे शिकते ते समग्र (holistic ) असते. यात मुलांच्या शारीरिक भाषा, भावनिक, मानसिक आणि बौध्दिक क्षमता एकत्रितपणे विकसित होतात.

★ मूल स्वतः एवाद्या गोष्टीचे आकलन करून घेते, तेव्हा ती गोष्ट त्याला आतून समजलेली असते. त्यामुळे त्याला पाठांतरासारख्या कृत्रिम साधनेची गरज भासत नाही.

★ मूल अनुभवातून म्हणजेच मूर्ततेतून शिकत असते. त्यामुळे मोठ्या वयात अमूर्ततेकडे जाताना त्याचा पाया भक्कम होतो.

★ मूल स्वतः शिकत असते तेव्हा अनेक गोष्टी धडत असतात. मूल जबाबदारी घ्यायला शिकते. मुलाच्या या शिकण्यात इतरही जण सामील असतात तेव्हा सहकार्य करणे, मदत करणे, एकमेकांची काळजी घेणे, स्पर्धेची भावना न जोपासता एकमेकांना पूरक ठरुन एकत्र काम करणे अशी मूल्ये मुलांमध्ये वाढीला लागतात.

★ पालक / शिक्षक जेंव्हा असा अवकाश मुलांना देतात तेव्हा त्यांचाही मुलांना शिकविण्याचा ताण कमी होतो. कारण मूल स्वतः जबाबदारी घेत शिकत जाते हे मोठयांना अनुभवायला मिळते.

## या साठी हे समजून घेणे आवश्यक आहे -

★ मुलं सहज काय शिकू पहातात ते आपण समजून त्याला अवकाश देणे.

★ मुलांच्या जगण्याचे खेळ, अभ्यास आणि काम असे भाग न करता त्याचे खेळणे हेच त्याचे काम आहे आणि त्याचे काम हेच त्याचे शिकणे

## शैक्षणिक कृतीवर्गातील खेळपध्दती आणि सहजशिक्षणवर्ग (कामाचा वर्ग) खेळपध्दती या दोन प्रकारातील फरक असे मांडता येतील -

| शैक्षणिक कृतीवर्ग - (शाळेतील पहिल्या प्रकारची खेळ पध्दती) | सहजशिक्षण वर्ग (कामाचा वर्ग) (शाळेतील दुसऱ्या प्रकारची खेळ पध्दती) |
|---|---|
| ★ मुले मोठ्यांनी दिलेल्या कृतींमधून स्वतःच्या ज्ञानाची रचना स्वतः करतात. | ★ मुलं स्वतःच्या कृतींमधून स्वतःच्या ज्ञानाची रचना स्वतः करतात. |
| ★ अपेक्षित ज्ञानची रचना करायची म्हणून कृती केली जाते. | ★ ज्ञानाची रचना करायची म्हणून कृती केली जात नाही. |
| ★ मुलांच्या शैक्षणिक कृती ठरलेल्या असतात. जसे - अक्षर आणि चित्र जोडी अक्षरगाडी, शब्दगाडी, क्रमवारी कार्ड चित्र-शब्दवाचन कार्ड,अंकाएव्हढ्या वस्तू ठेवणे, संख्याक्रिया, वस्तूंमधून नाट्यीकरण, चित्रवाचन, वाचनदिशा कार्ड, वाचनपूर्व तयारी कार्ड. | ★ मुलांच्या कृती ठरलेल्या नसतात. |
| ★ साहित्य निर्मिती-शैक्षणिक साधने शिक्षकवर्गाकडून तयार केली जातात. | ★ परिसर हेच शैक्षणिक साधन असते. भरपूर विविध प्रकारच्या वस्तू, प्रक्रिया घडत असलेला परिसर, माणसे, पाने, झाडे, पशू, पक्षी, दगड, माती, पाणी इ.इ. काहीही.. |
| ★ कुठल्या साधनांचा उपयोग कोणत्या प्रकारच्या ज्ञानाच्या रचनेसाठी हे शिक्षकाने ठरवलेले असतं. | ★ काही ठरलेले नसते. उत्स्फूर्त, समोर असलेल्या वस्तू, परिस्थिती यांचे खेळकरपणा आणि कुतूहल यातून काम सुरु. |
| ★ मुलं ड्रायव्हर असली तरी त्यांचे पोहचायचे ठिकाण शिक्षकाने ठरवलेले असते. | ★ मुले ड्रायव्हर असतात पण कुठे जायचं ते त्यांनाही माहित नसते. |
| ★ मुलांच्या ज्ञानाची कोणती रचना करायची हे मोठे ठरवतात. | ★ मुलांच्या ज्ञानाची कोणती रचना होईल हे मुलांनाही माहीत नसते. |
| ★ कृतीयुक्त वर्गातील ज्ञानाची रचना ही ठरवून कृत्रिम पध्दतीने होते असे म्हणा येईल. | ★ तर सहजशिक्षणातील ज्ञानाची रचना ही नैसर्गिक आहे. |
| ★ ज्ञानरचनावादी वर्गात सहज शिक्षणाला वाव नसतो. | ★ पण सहजशिक्षणात ज्ञानरचनावाद खऱ्या अर्थाने सामावलेला आहे. |

# मुलांच्या खेळाबरोबर मुलांचे चित्र काढणे याविषयीचा पालकांशी संवाद



★ मूल चित्र का काढते यावर सखोल विचार पालकांसमवेत मांडले जातात.

★ चित्र ही कला नव्हे तर आकलनाचे प्रभावी माध्यम आहे हे समजावून घेतले जाते.

★ काढलेल्या चित्राला सुंदर आहे किंवा नाही असा शेरा मारुन मुलांच्या आयुष्यातून चित्र काढण्याची प्रक्रिया संपवली जाते का यावर विचार केला जातो.

★ मुलांच्या चित्रात सुधारणा, दुरुस्ती केली जात नाही ना हे बघितले जाते.

★ कला हे एक अंतिम स्वरुप आहे तर चित्र काढणे ही एक प्रक्रिया, हे समजून घेतले जाते.

★ चित्र काढण्याला कला समजून मुलांच्या आकलन प्रक्रियेला मर्यादा घातली जाते का हे बघितले जाते.

★ मुलांनी स्वतः काढलेल्या चित्राचे अर्थपूर्ण विवेचन करण्यास त्याला वाव दिला जातो. यातून मुलं कशाप्रकारे चित्रातील समस्या वाचतात, ती सोडवतात, त्यात भावनांची अर्थपूर्ण मांडणी करतात हे पाहिले जाते.

# मुलांची चित्रे - नवा विचार करतो

- ★ चित्र पुस्तके
- ★ रंग भरणे
- ★ चित्र बघून चित्र काढणे
- ★ युक्त्या वापरुन चित्र काढणे

**हे नको**






**चित्र काढणे हे मुलांचे आकलन माध्यम आहे**
**त्यासाठी मुलांना रंगात अडकवायला नको.**

## पालक मित्र मैत्रिणींनो जरा विचार करु -

★ मूलांना प्रत्यक्ष जग वाचायचे असते आणि आपण **शब्द**, **अक्षरे**, यांच्यात त्यांना अडकवतो का?

★ त्यांना प्रत्यक्ष अनुभव घ्यायचा असतो, आपण **वर्णन** करतो का?

★ त्यांना खरं खरं बघायचं असतं तर **कल्पित** त्यांच्यापुढे ठेवतो का?

★ त्यांची **समग्र समज** आपण **टप्प्यात विभागतो** का?

★ त्यांच्या **संदर्भासह** जगण्याला आपण **संदर्भरहित** करतो का?

★ प्रत्यक्ष **अनुभव** न देता **कल्पना** करायला लावतो का?

**एकूण पालकांबरोबर संवाद साधून घराघरात कामाचा वर्ग तयार करण्याचा प्रयत्न सुरु आहे व होत राहणार आहे.**

## एक नवा विचार करायला आवडेल का पहा !

मूल प्रत्येक क्षणी त्याच्या आजूबाजूचे जग शिकत आहे. ते समजून घेऊन स्वतःच्या पध्दतीने ते शिकण्याचा प्रयत्न करत आहे. त्यासाठी ते निसर्गतःच सक्षम आहे.

आपण कळत नकळत हस्तक्षेप करुन त्याच्या नैसर्गिक प्रक्रियेत अडथळा तर आणत नाही ना?

मुलाच्या सहज शिक्षण प्रक्रियेत आपल्याला काय करायचे, तर -

★ त्याला मोकळे, सुरक्षित, प्रेमाचे वातावरण द्यायचे.

★ ते प्रत्येकक्षणी शिकत आहे यावर विश्वास ठेवायचा.

★ त्याला आपल्यावर अवलंबून न ठेवता स्वावलंबी करायचे आहे.

★ ते काय शिकू पाहते याचे निरिक्षण करायचे आहे. म्हणजेच उत्तम अवलोकक व्हायचं आहे.

★ एक उत्तम मदतनीस म्हणून आपल्याला काम करायचे आहे.

# नवीन शैक्षणिक धोरणानुसार - इयत्ता ३री पर्यंत
# -अपेक्षित पायाभूत साक्षरता

★ आनंददायी अर्थपूर्ण वाचन

★ समजून बोलणे, ऐकलेले समजणे

★ आवश्यकतेनुसार लिहिता येणे

## पायाभूत संख्या-ज्ञान

★मोजता येणे, वस्तू मोजून अंक ओळख होणे

★अंकाच्या कुटुंबाची ओळख होणे, प्रश्न विचारता येणे

★बेरीज - वजाबाकी यासारख्या मूलभूत संख्या क्रिया अवगत होणे.

## मुलांच्या सहजशिक्षणाला म्हणजेच दुसऱ्या प्रकारच्या खेळपध्दतीला पूर्ण वाव दिला गेला तर यापेक्षा पुढच्या गोष्टी निश्चितपणे शक्य आहेत.

म्हणूनच -

शाळा आणि सहजशिक्षण यांचा मेळ घालत आपण बालशिक्षणाकडे नव्या दृष्टीने बघत आहोत. आता...

**सरस्वती मंदिर ट्रस्ट पूर्व प्राथमिक विभागातील**
**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार**

# पायाभूत टप्प्यातील बालशिक्षण म्हणजेच शैक्षणिक कृतीवर्गातील बालशिक्षण समजून घेऊया...





















# NEP 2020
# मूलाचा समग्र  सर्वांगीण विकास - पंचकोश विकास

**समग्रपणे साध्य**




१) अन्नमय आणि प्राणमय कोश - शारीरिक विकास -
**Physical Development**

२) मनोमय कोश - भावनिक व सामाजिक विकास -
**Socio-Emotional Development**

३) प्राणिक विकास - भाषा विकास -
**Language and Literacy Development**

४) विज्ञानमय कोश - बौध्दिक विकास -
**Cognitive Development**

५) आनंदमय कोश - सांस्कृतिक व कलात्मक विकास -
**Aesthetic and Cultural Development**

**NEP 2020 नुसार या पाच कोशांवर (विकासक्षेत्रांवर) परस्परावलंबी आणि परस्पर साध्य करण्यायोग्य काम करणे अपेक्षित आहे.**




**NEP 2020 नुसार पाच विकासक्षेत्रे समग्रपणे विकसित करताना मुलांबरोबर करायचे काम खालीलप्रमाणे असणे अपेक्षित आहे.**

हे काम
- लवचिक
- बहुआयामी
- खेळावर आधारित
- कृतींवर आधारित
- कुतुहल आधारित

असावे.

ते काम करताना मुलांमधील
- सामाजिक कौशल्ये,
- संवेदनशीलता,
- चांगले शिष्टाचार,
- सौजन्य, नीतिमुल्ये,
- वैयक्तिक आणि सार्वजनिक स्वच्छता,
- संघकार्य आणि सहकार्य

यांच्या विकासावर लक्ष केंद्रित करायचे आहे.



# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०20 ची अंमलबजावणी करताना मुलांच्या समग्र विकासासाठी




१) निपुण भारत अभियान - २०२१




२) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२२ (रा.अ.आ.)




या दोन महत्त्वाच्या आराखड्यांनुसार काम करणे आवश्यक आहे.

## ९) निपुण भारत अभियानानुसार

मुलांच्या समग्र सर्वांगीण विकासासाठी

(पंचकोश विकासासाठी)

३ विकासात्मक ध्येय (DGs) आखली आहेत, ती अशी-




**विकासात्मक ध्येय १ -**

**Developmental Goal 1 (DG1)**

**चांगले आरोग्य आणि कल्याण**

**Good Health and Well-being**

**विकासात्मक ध्येय २ -**

**Developmental Goal 2 (DG2)**

**मुलं उत्तम संवादक व्हावीत.**

**Effective Communicator**

**विकासात्मक ध्येय ३ -**

**Developmental Goal 3 (DG3)**

**मुलं सहभागी अध्ययनार्थी व्हावीत.**

**Involved Learner**

# मुलांच्या समग्र सर्वांगीण विकासासाठी म्हणजेच पंचकोश विकासासाठी

## निपुण भारत अभियानानुसार विकासात्मक ध्येयांनी खालील गोष्टी साध्य करणे अपेक्षित आहे.

| | |
|---|---|
| विकासात्मक ध्येय १ - DG1<br>चांगले आरोग्य आणि कल्याण | पूर्व प्राथमिक स्तरापासून मुलांचे योग्य सामाजीकरण, आरोग्यदायी सवयींचा विकास, वैयक्तिक आणि सामूहिक खेळातील सहभाग व कारक कौशल्यांचा विकास या गोष्टींचा समावेश आहे. तसेच निर्णयक्षमता, समस्या निराकरण, स्व-जाणीवेचा विकास या एकविसाव्या शतकातील जीवन कौश्यल्यांचाही यामध्ये समावेश आहे. |

| | |
|---|---|
| विकासात्मक ध्येय २ - DG2<br>मुलं उत्तम संवादक व्हावीत. | मुलांनी पुस्तकांशी मैत्री करुन वाचन संस्कृती विकसित करावी तसेच उत्तम लेखनशैली जोपासावी. |

| | |
|---|---|
| विकासात्मक ध्येय ३ - DG3<br>मुलं सहभागी अध्ययनार्थी व्हावीत. | भोवतालच्या परिस्थितीशी समन्वय साधून सतत शिकत राहणारा विद्यार्थी यामधून तयार व्हावा. |

# मुलांच्या समग्र सर्वांगीण विकासासाठी म्हणजेच पंचकोश विकासासाठी

विकासात्मक ध्येय १ - DG1 चांगले आरोग्य आणि कल्याण
विकासात्मक ध्येय २ - DG2 मुलं उत्तम संवादक व्हावीत.
विकासात्मक ध्येय ३ - DG3 मुलं सहभागी अध्ययनार्थी व्हावीत.

➡ वरील प्रत्येक विकासात्मक ध्येयांतर्गत **काही कौशल्य (Skills) विकसित** करायची आहेत.

➡ त्यासाठी **काही क्षमतांवर (Competencies)** काम करायचे आहे.

➡ त्या क्षमता मुलांमध्ये विकसित झाल्या आहेत का याच्या पडताळणीसाठी प्रत्येक क्षमतेच्या वयानुसारच्या **अध्ययन निष्पत्ती (Learning Outcomes - Los)** पडताळायच्या आहेत.





**हे लक्षात घेऊया -**

**अध्ययन निष्पत्ती** म्हणजे मुलांमध्ये **क्षमता विकसित** झालेल्याच्या **मध्यवर्ती निर्देशक** होत.या **अध्ययन निष्पत्ती** या **ठराविक कालावधीत साध्य केल्या जातात**. तसेच त्या **ठराविक कालावधीत प्राप्त करता येतात**..

## निपुण विकासात्मक ध्येय १ - DG1 नुसार
## (चांगले आरोग्य आणि कल्याण)
## विकसित करण्याची कौशल्ये (Skills) खालील प्रमाणे

१) स्वतःबद्दलची जाणीव
२) स्वतःबद्दलचा आत्मविश्वास
३) स्वयंशिस्त
४) निर्णयक्षमता आणि समस्या सोडवण्याची क्षमता
५) सामाजिक वर्तनाचा विकास
६) आरोग्यपूर्ण सवयी, स्वच्छतेच्या सवयी आणि स्वतःच्या सुरक्षिततेची जाणीव
७) स्थूल स्नायूविकास
८) सूक्ष्म स्नायूविकास आणि डोळे व हात समन्वय
९) गट खेळातील सहभाग
१०) वैयक्तिक खेळातील सहभाग

**निपुण विकासात्मक ध्येय १ - DG1 च्या कौशल्यांनुसार (चांगले आरोग्य आणि कल्याण) खालील क्षमता (Competencies) विकसित करणे अपेक्षित आहे.**

१) चांगले आरोग्य, पौष्टिक खाणे सवयी विकसित करणे.

२) आरोग्यपूर्ण आणि सुरक्षिततेच्या सवयी विकसित करणे.

३) सामाजिक आणि भावनिक विकास अनुभव देणे.

४) विविधतेबद्दल आदर व त्याचा आंतरभाव करणे.

५) स्थूल आणि सूक्ष्म स्नायू विकासाला प्राधान्य देणे.

६) मुलांना स्वतःच्या स्वतः क्षमता विकसनाचा आत्मविश्वास आणि अवकाश मिळणे.

७) चांगल्या आरोग्यपूर्ण सवयी लागून चांगली शरीरयष्टी तयार होणे.

**निपुण विकासात्मक ध्येय २ - DG2 नुसार**
**( मुलं उत्तम संवादक व्हावीत.)**
**विकसित करण्याची कौशल्ये (Skills) खालील प्रमाणे**

## श्रवण व संभाषण -

१) समजपूर्वक श्रवण
२) सर्जनशीलपणे स्वअभिव्यक्ती व संवाद साधणे
३) भाषा आणि सर्जनशील विचार
४) शब्दसंग्रह वाढ
५) संवाद आणि बोलण्याचे कौशल्य
६) भाषेचा अर्थपूर्ण वापर

## समजपूर्वक वाचन -

१) पुस्तकांशी मैत्री
२) छापील सजगता आणि अर्थ लावणे
३) वाचन अभिनय
४) ध्वनी व लिपी परस्परसंबंध जाणीव
५) पूर्वानुभवाचा वापर व अंदाज लावता येणे
६) स्वतंत्रपणे आनंदासाठी आणि विविध आवश्यकतानुसार वाचन करता येणे.

## निपुण विकासात्मक ध्येय २ - DG2 नुसार
## ( मुलं उत्तम संवादक व्हावीत.)
## विकसित करण्याची कौशल्ये (Skills) खालील प्रमाणे

### जाणीवपूर्वक लेखन -

१) सुरुवातीची साक्षरता कौशल्य

२) स्वतःला व्यक्त होण्यासाठीचे लेखन करणे.

३) माहित असलेली अक्षरे लिहिणे.

४) पारंपारिक पध्दतीने लेखन करण्याचा प्रयत्न करण.

५) वाचनाला प्रतिक्रीया म्हणून चित्र काढणे किंवा शब्द किंवा अर्थपूर्ण वाक्य लिहिणे.

६) यमकाचे शब्द लिहिणे.

७) नाम किंवा क्रियापद याचा वापर करुन वाक्य लिहिणे.
उदा. गीता नाचते.

८) स्वतःला व्यक्त होण्यासाठी संदेश लिहितात.

९) मिश्रभाषेचा वापर करुन संदेश (CODES) लिहितात.

१०) शाळेत व घरात वेगवेगळ्या कारणासाठी लेखन करु शकतात.

**निपुण विकासात्मक ध्येय २ - DG2 च्या कौशल्यांनुसार (मुलं उत्तम संवादक व्हावीत.)**
**खालील क्षमता (Competencies) विकसित करणे अपेक्षित आहे.**

१) जेव्हा तीन वर्षांची मुलं शाळेत येतात तेव्हा ती आपल्या गरजा,आवड-निवड हे त्यांच्या मातृभाषेत बऱ्यापैकी सांगू शकत असतात. हा त्यांचा संवादक म्हणून पाया धरला जातो. या पायावर दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्य विकसित करणे.

२) मूल तोंडी आपले विचार, भावना किंवा त्यांचे अनुभव कथन करु शकणे.

३) मूल माहिती गोळा करुन, ती सांगू शकणे.

४) गुंतागुंतीचे आणि कल्पक विचार करणे.

५) मातृभाषेत सफाईदारपणे वाचन व लेखन करणे.

**निपुण विकासात्मक ध्येय ३ - DG3 नुसार**
**(मुलं सहभागी अध्ययनार्थी व्हावीत.)**
**विकसित करण्याची कौशल्ये (Skills) खालील प्रमाणे**

## ज्ञानेंद्रिय विकास -

त्वचा, नाक, कान, डोळे व जीभ

## बौध्दिक विकास -

निरिक्षण,स्मरणशक्ती, ओळखणे, समानता, वर्गीकरण, आकृतीबंध, अनुक्रमिक विचार, कल्पकता,तार्किक विचारशक्ती, समस्या, निकारण, कारणमिमांसा करु शकणे, प्रयोगशीलता, जिज्ञासा, अन्वेषण करण्याची वृत्ती.

## परिसर ज्ञान -

१) निसर्ग - प्राणी, फळ, भाज्या, अन्न
२) भौतिक - पाणी, हवा, ऋतु, सूर्य, चंद्र, दिवसरात्र
३) सामाजिक - मी, कुटुंब, वाहने, सण, मदतनीस

## विविध संकल्पना -

१) रंग, आकार, अंतर, मापन, आकारमान, लांबी, वजन, उंची, वेळ
२) अवकाश जाणीव
३) एकास एक संगती

**निपुण विकासात्मक ध्येय ३ - DG3 नुसार**
**(मुलं सहभागी अध्ययनार्थी व्हावीत.)**
**विकसित करण्याची कौशल्ये (Skills) खालील प्रमाणे**

**संख्याज्ञान -**

१) मोजणी करणे व किती ते सांगणे.

२) अंकचिन्ह ओळखणे.

३) संख्यास्थान ओळख (१० पर्यंत).

**संख्याक्रिया -**

१) बेरीज, वजाबाकी

२) गुणाकार, भागाकार

**मापन -**

लांबी, तापमान, घनफळ, वस्तूमान.

**आकार -**

द्वितलीय आणि त्रितलीय, सरळ रेषा, वक्ररेषा, सरळ आणि वक्र पृष्ठभाग.

**माहिती हाताळणी**

**आकृतीबंध**

**दिनदर्शिका कृती**

**तंत्रज्ञान वापर**

**निपुण विकासात्मक ध्येय ३ - DG3 च्या कौशल्यांनुसार (मुलं सहभागी अध्ययनार्थी व्हावीत.) खालील क्षमता (Competencies) विकसित करणे अपेक्षित आहे.**

१) मूलं त्यांच्या आजूबाजूचे जग सतत शिकत असतात. त्यात त्यांना पर्याय नसतो. ते जे बघतात ते ग्रहण करण्याची अफाट क्षमता त्यांच्यात असते. म्हणूनच मुलांची ही बौध्दिक क्षमता प्रभावीपणे विकसित करण्यासाठी ज्ञानेंद्रिय विकास सक्षम करणारे अनुभव देणे.

२) अन्वेषण, प्रयोगशीलता आणि चौकसवृत्ती यांना वाव मिळणे.

३) मुलांचा मूर्तकडून अमूर्तकडे प्रवास करताना मूर्त गोष्टींचे अनुभव देणे, त्याविषयी परस्पसंवाद होणे.

४) गणिती संकल्पना व विचार क्षमता विकसित करणे.

५) पायाभूत संख्याज्ञानाचे घटक, गणनपूरक संकल्पना, संख्याज्ञान, तर्कशक्ती वगैरे विकसित करणे.




## २) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यानुसार (रा.अ.आ.) मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी ५ विकासक्षेत्रांवर (पंचकोश विकास) समग्र काम करणारी अभ्यासक्रमाची १३ उद्दिष्टे (Curricular Goals - CGs) आखली आहेत.

### राष्ट्रीय अभ्यासक्रमाची १३ उद्दिष्टे (Curricular Goals - CGs) -

**CG - 1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.

**CG - 2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.

**CG - 3** सुदृढ आणि लवचिक शरीर विकसित होते.

**CG - 4** बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात म्हणजे त्यांनी स्वतःच्या भावना समजून घेऊन त्यांचे व्यवस्थापन करण्याची आणि सामाजिक नियमांना सकारात्मक प्रतिसाद देण्याची क्षमता होय.

**CG - 5** बालके उत्पादक कार्याबाबत व सेवांबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतात.

**CG - 6** बालके स्वतःभोवतालच्या नैसर्गिक वातावरणाबद्दल कृतज्ञताभाव दर्शवितात.

**CG - 7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.

**CG - 8** बालके प्रमाण, आकार व मोजमापे या गणितीय आकलन आणि क्षमतेद्वारे सभोवतालचे जग समजून घेण्याची क्षमता विकसित करतात.

**CG - 9** बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.

**CG - 10** बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.

**CG - 11** बालके भाषा दोन (L2) मध्ये वाचन आणि लेखनाचा आरंभ करतात.

**CG - 12** बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.

**CG - 13** बालके अध्ययनाच्या सवयी विकसित करतात. यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते.




**राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडाच्या १३ अभ्यासक्रम उद्दिष्टांमार्फत म्हणजेच Curricular Goals (CGs) मार्फत पंचकोश विकास म्हणजेच मुलांचा सर्वांगीण विकास समग्रपणे अशाप्रकारे साध्य होतो.**

## १) शारीरिक विकास (अन्नमय आणि प्राणमय कोश )

### राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याची ध्येये

**CG - 1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.

**CG - 2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.

**CG - 3** सुदृढ आणि लवचिक शरीर विकसित होते.

## २) सामाजिक/भावनिक/मानसिक/नैतिक विकास (मनोमय कोश)

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याची ध्येये

**CG - 4** बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात म्हणजे त्यांनी स्वतःच्या भावना समजून घेऊन त्यांचे व्यवस्थापन करण्याची आणि सामाजिक नियमांना सकारात्मक प्रतिसाद देण्याची क्षमता होय.

**CG - 5** बालके उत्पादक कार्याबाबत व सेवांबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतात.

**CG - 6** बालके स्वतःभोवतालच्या नैसर्गिक वातावरणाबद्दल कृतज्ञताभाव दर्शवितात.

## ३) बोधात्मक विकास/बौध्दिक विकास (विज्ञानमय कोश)

### राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याची ध्येये

**CG - 7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.

**CG - 8** बालके प्रमाण, आकार व मोजमापे या गणितीय आकलन आणि क्षमतेद्वारे सभोवतालचे जग समजून घेण्याची क्षमता विकसित करतात.

## ४) भाषा व साक्षरता विकास (प्राणिक विकास)

**राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याची ध्येये**

**CG - 9** बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.

**CG - 10** बालके भाषा एक (**L1**) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.

**CG - 11** बालके भाषा दोन (**L2**) मध्ये वाचन आणि लेखनाचा आरंभ करतात.

## ५) सौंदर्यदृष्टी आणि सांस्कृतिक विकास/ आत्मिक विकास (आनंदमय कोश)

**राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याची ध्येये**

**CG - 12** बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.

## • सकारात्मक सवयी विकसित करणे

**राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याची ध्येये**

**CG - 13** बालके अध्ययनाच्या सवयी विकसित करतात. यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते.







# निपुण विकासात्मक ध्येय
# (Developmental Goals - DGs)
# आणि
# राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा उद्दिष्ट
# (Curricular Goals - Cgs)
# जोडणी अशाप्रकारे ..

## निपुण विकासात्मक ध्येय १ - DG1 चांगले आरोग्य आणि कल्याण

⬇

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा उद्दिष्टे –

**CG - 1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.

**CG - 3** सुदृढ आणि लवचिक शरीर विकसित होते.

**CG - 4** बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात म्हणजे त्यांनी स्वतःच्या भावना समजून घेऊन त्यांचे व्यवस्थापन करण्याची आणि सामाजिक नियमांना सकारात्मक प्रतिसाद देण्याची क्षमता होय.

## निपुण विकासात्मक ध्येय २ - DG2 मुलं उत्तम संवादक व्हावीत.

⬇

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा उद्दिष्टे –

**CG - 9** बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.

**CG - 10** बालके भाषा एक (**L1**) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.

**CG - 11** बालके भाषा दोन (**L2**) मध्ये वाचन आणि लेखनाचा आरंभ करतात.

**CG - 12** बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.

**निपुण विकासात्मक ध्येय ३ - DG3 मुलं सहभागी अध्ययनार्थी व्हावीत.**

⬇

**राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा उद्दिष्टे -**

**CG - 2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.

**CG - 5** बालके उत्पादक कार्याबाबत व सेवांबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतात.

**CG - 6** बालके स्वतःभोवतालच्या नैसर्गिक वातावरणाबद्दल कृतज्ञताभाव दर्शवितात.

**CG - 7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.

**CG - 8** बालके प्रमाण, आकार व मोजमापे या गणितीय आकलन आणि क्षमतेद्वारे सभोवतालचे जग समजून घेण्याची क्षमता विकसित करतात.

**CG - 13** बालके अध्ययनाच्या सवयी विकसित करतात. यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते.




# मुलांच्या पंचकोश विकासासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा उद्दिष्ट्ये खालीलप्रकारे निपुण विकासात्मक ध्येये साध्य करतात.




१. शारीरिक विकास -
अन्नमय आणि प्राणमय कोश

⬇

- रा.अ.आ - 2022 CGs - CG-1, CG-2, CG-3

⬇

- निपुण विकासात्मक ध्येये DGs - DG1, DG3

२. सामाजिक आणि भावनिक विकास -
मनोमय कोश

⬇

- रा.अ.आ - 2022 - CGs - CG-4, CG-5, CG-6, CG-13

⬇

- निपुण विकासात्मक ध्येये DGs - DG1, DG3

३. बौध्दिक विकास -
विज्ञानमय कोश

⬇

- रा.अ.आ - 2022 - CGs - CG-7, CG-8

⬇

- निपुण विकासात्मक ध्येय DGs - DG3

४. भाषा विकास -
प्राणिक विकास

⬇

- रा.अ.आ - 2022 - CGs - CG-9, CG-10, CG-11

⬇

- निपुण विकासात्मक ध्येय DGs - DG2

५. कलात्मक आणि सांस्कृतिक विकास -
आनंदमयमय कोश

⬇

- रा.अ.आ - 2022 - CG - CG-12

⬇

- निपुण विकासात्मक ध्येय DGs - DG2

**म्हणजेच राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याच्या १३ अभ्यासक्रम उद्दिष्ट्यांवरील (CGs) काम, निपुणची ३ विकासात्मक ध्येय (DGs) साध्य करत मुलांचा सर्वांगीण विकास घडवतात.**




राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याची १३ अभ्यासक्रम उद्‌दिष्टे




निपुण विकासात्मक ध्येय १ - DG1
चांगले आरोग्य आणि कल्याण

निपुण विकासात्मक ध्येय २ - DG2
मुलं उत्तम संवादक व्हावीत.

निपुण विकासात्मक ध्येय ३ - DG3
मुलं सहभागी अध्ययनार्थी व्हावीत.



आई - बाबा,

माझे पंचकोश विकसित होण्यासाठी माझ्यामध्ये प्रत्येक कोशानुसार कोणत्या क्षमता विकसित करायच्या व त्या विकसित झाल्या आहेत की नाहीत यासाठी कोणत्या अध्ययन निष्पत्ती माझ्या वयानुसार पहायच्या हे पहा...



## माझा शारीरिक विकास - अन्नमय आणि प्राणमय कोश
## Physical Development

⬇

**रा.अ.आ - 2022 - CGs**

**अभ्यासक्रमाची ध्येये**

**CG - 1** बालके त्यांना निरोगी आणि सुरक्षित ठेवणाऱ्या सवयी विकसित करतात.

**CG - 2** बालके ज्ञानेंद्रियांची कुशाग्रता विकसित करतात.

**CG - 3** सुदृढ आणि लवचिक शरीर विकसित होते.

⬇

**निपुण विकासात्मक ध्येये - DGs**

**विकासात्मक ध्येय १ - DG1 - चांगले आरोग्य आणि कल्याण**

**विकासात्मक ध्येय ३ - DG3 - मुलं सहभागी अध्ययनार्थी व्हावीत.**

यानुसार

**शारीरिक विकास क्षेत्रातील** माझ्यामध्ये अपेक्षित **क्षमता** आणि त्या क्षमता पडताळणीच्या **वयानुसार अपेक्षित अध्ययन निष्पत्ती** पहा...

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

## सूक्ष्म स्नायू विकास

**क्षमता १ - हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालींमध्ये अचूकता व नियंत्रण दर्शविणे.**

**अ.नि १ -** मी सूक्ष्म स्नायू विकास विविध कृतीतून दाखवतो का?
तसेच सोप्या हात व डोळे कृती करता येतात का? जसे गिरगिटवणे, ठसेकाम, रंगविणे मातीकाम, फाडकाम, चिकटकाम, ओवणे इत्यादी..






## माझा स्थूल स्नायू विकास

**क्षमता १ - एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना ताकद व चिकाटी दाखविणे.**

**अ.नि १ -** चालणे, धावणे, उड्या मारणे, चढणे, उतरणे यासारख्या स्थूल स्नायू विकास कृती मी करतो का? खेळात समन्वय दाखवतो का?




| माझा शारीरिक विकास - प्राणमय कोश<br>Physical Development | पायाभूत टप्पा १<br>वयोगट ३-४ वर्षे |
| --- | --- |

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

## स्वच्छता व आरोग्य

**क्षमता १ - पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शविणे, अन्न वाया न घालवणे.**

**अ.नि १ -** मी आपल्या गरजा सांगतो का? चांगल्या आरोग्याच्या सवयी व पौष्टिक खाण्याच्या सवयी याविषयी मला जागरुकता आहे का?





**क्षमता २ - ★ असुरक्षित/धोकादायक परिस्थिती समजून घेऊन मदत मागणे.**

**★ परिचित आणि अपरिचित व्यक्ती यातील फरक ओळखणे.**

**अ.नि २ -** अनोळखी व्यक्तींबाबत दूर राहणे मला समजते का? तसेच मला चांगले स्पर्श वाईट स्पर्श समजतात का?



**क्षमता ३ - वस्तू आणि सोप्या साधनांचा सुरक्षितपणे वापर करणे.**

**अ.नि ३ -** मी नेहमीचे धोके ओळखतो का? धोकादायक गोष्टी आणि जागांपासून मी लांब राहतो का?

| माझा शारीरिक विकास - प्राणमय कोश<br>Physical Development | पायाभूत टप्पा १<br>वयोगट ३-४ वर्षे |
|---|---|

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

## स्वच्छता व आरोग्य

क्षमता ४ - ★ प्राथमिक व द्वितीय रंगछटा फरक समजणे, लांबी, रुंदी, उंची या मितीचे आकार, रंग आणि त्याच्या छटा यामधील फरक ओळखणे.

★ चिन्हे, प्रतिके यांकरिता दृकस्मृती विकसित करणे.

★ आवाजातील चढ-उतार, सूर-ताल-लय यानुसार आवाजातील फरक ओळखणे.

★ वेगवेगळे गंध/चव यांतील फरक ओळखणे.

★ विविध प्रकारच्या स्पर्शामधील फरक करण्याची क्षमता विकसित होणे.

★ अनुभवांची सर्वंकष जाणीव होण्यासाठी ज्ञानेंद्रियांमार्फत प्राप्त संवेदनांचे एकात्मीकरण करण्यास सुरुवात करणे.



**अ.नि ४ -** आपल्या ज्ञानेंद्रियांचा वापर करुन सभोवतालच्या परिसराचे निरिक्षण करुन त्याचे अन्वेषण करतो का?

| माझा शारीरिक विकास - अन्नमय कोश<br>Physical Development | पायाभूत टप्पा २<br>वयोगट ४-५ वर्षे |
| --- | --- |

**क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (Competencies and Learning Outcomes)**

## सूक्ष्म स्नायू विकास

**क्षमता १ - हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालींमध्ये अचूकता व नियंत्रण दर्शविणे.**

**अ.नि १ -** सूक्ष्म स्नायू विकास विविध कृतीतून दाखवतो का? तसेच ज्या कृतींना हात व डोळे समन्वय जास्त प्रमाणात लागतो अशा कृतीमध्ये काही प्रमाणात अचूकता दर्शवतो का?






## माझा स्थूल स्नायू विकास

**क्षमता १ - एखादी वस्तू वाहून नेताना, चालताना, पळताना ताकद व चिकाटी दाखविणे.**

**अ.नि १ -** स्थूल स्नायू विकासकृतींवर प्राविण्य असल्याचे दाखवतो का? तसेच खेळामध्ये चालणे, धावणे, उड्या मारणे चढणे, उतरणे यासारख्या कृतींवर ताबा असल्याचे दर्शवतो का?





| माझा शारीरिक विकास - प्राणमय कोश<br>Physical Development | पायाभूत टप्पा २<br>वयोगट ४-५ वर्षे |
|---|---|

**क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (Competencies and Learning Outcomes)**

## स्वच्छता व आरोग्य

**क्षमता १ - ★ पोषक आहाराबाबत रुची आणि समज दर्शविणे, अन्न वाया न घालवणे.**

**★ स्वत:ची मूलभूत काळजी/स्वच्छता यांचा अवलंब करणे.**

**अ.नि १ -** चांगल्या आरोग्यासाठी स्वच्छता आणि स्वच्छतेच्या सवयी तसेच पौष्टिक खाण्याच्या सवयी याविषयी जागरुकता दर्शवतो का? आणि स्वतंत्रपणे करु शकतो का?





**क्षमता २ - वस्तू आणि सोप्या साधनांचा सुरक्षितपणे वापर करणे.**

**अ.नि २ -** नेहमीचे धोके आणि धोकादायक गोष्टी ओळखतो का? आणि त्याबाबत सुरक्षेची खबरदारी घेता येते का?.

**क्षमता ३ - असुरक्षित/धोकादायक परिस्थिती समजून घेवून मदत मागणे.**

**अ.नि ३ -** चांगले स्पर्श वाईट स्पर्श समजतात का?

आणि त्यामुळे अनोळखी व्यक्तींपासून दूर राहतो का?



## स्वच्छता व आरोग्य

**क्षमता ४ -** ★ प्राथमिक व द्वितीय रंगछटा फरक समजणे, लांबी, रुंदी, उंची या मितीचे आकार, रंग आणि त्याच्या छटा यामधील फरक ओळखणे.

★ चिन्हे, प्रतिके यांकरिता दृकस्मृती विकसित करणे.

★ आवाजातील चढ-उतार, सूर-ताल-लय यानुसार आवाजातील फरक ओळखणे.

★ वेगवेगळे गंध/चव यांतील फरक ओळखणे.

★ विविध प्रकारच्या स्पर्शामधील फरक करण्याची क्षमता विकसित होणे.

★ अनुभवांची सर्वंकष जाणीव होण्यासाठी ज्ञानेंद्रियांमार्फत प्राप्त संवेदनांचे एकात्मिकरण करण्यास सुरुवात करणे.

**अ.नि ४ -** आपल्या ज्ञानेंद्रियांचा वापर करुन सभोवतालच्या परिसराचे निरिक्षण करुन त्याचे अन्वेषण करतो का?



| माझा शारीरिक विकास - अन्नमय कोश<br>Physical Development | पायाभूत टप्पा ३<br>वयोगट ५-६ वर्षे |
|---|---|

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (Competencies and Learning Outcomes)

## सूक्ष्म स्नायू विकास

**क्षमता १ - हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालींमध्ये अचूकता आणि नियंत्रण दाखवणे.**

**अ.नि १ -** सूक्ष्म स्नायू विकासाच्या विविध कृतींमध्ये ताबा आणि अचूकता असते का?






**क्षमता २ - हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालींमध्ये अचूकता आणि नियंत्रण दर्शवणे.**

**अ.नि २ -** गुंतागुंतीच्या कृतींमध्ये समन्वय साधता येतो का? जसे रेषेवर कापणे, ओतणे, बटणे लावणे.



**क्षमता ३ - हाताने कृती करताना हात व बोटे यांच्या हालचालींमध्ये अचूकता आणि नियंत्रण दर्शवणे.**

**अ.नि ३ -** लिहिण्याकरीता, चित्र काढण्याकरीता, रंगविण्याकरीता साधने धरताना माझ्या अंगठा आणि चाफेकळीमधे पकड आहे हे जाणवते का?



| माझा शारीरिक विकास - अन्नमय कोश<br>**Physical Development** | पायाभूत टप्पा ३<br>वयोगट ५-६ वर्षे |
|---|---|

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

## माझा स्थूल स्नायू विकास

**क्षमता १- विशिष्ट कृती करताना ज्ञानेंद्रियांच्या संवेदना व शारीरिक हालचाली यांत समन्वय दर्शविणे - जसे चेंडू टाकणे, पकडणे, लाथ मारणे.**

**अ.नि १ -** स्थूल स्नायू विकासकृतींवर जास्त प्राविण्य असल्याचे दाखवतो का? तसेच खेळामध्ये चालणे, धावणे, उड्या मारणे, चेंडू टाकणे,लाथ मारणे, पकडणे यासारख्या कृती ताबा ठेवून व शक्तीने करत असल्याचे दर्शवतो का?



| माझा शारीरिक विकास - प्राणमय कोश<br>**Physical Development** | पायाभूत टप्पा ३<br>वयोगट ५-६ वर्षे |
|---|---|

## स्वच्छता व आरोग्य

**क्षमता १ - स्वतःची मूलभूत काळजी आणि स्वच्छता यांचा अवलंब करणे.**

**अ.नि १ -** चांगल्या आरोग्यासाठी स्वच्छता आणि स्वच्छतेच्या सवयी तसेच पौष्टिक खाण्याच्या सवयी याविषयी जागरुकता दर्शवतो का? आणि स्वतंत्रपणे त्या सवयींचे पालन करु शकतो का?



| माझा शारीरिक विकास - प्राणमय कोश<br>Physical Development | पायाभूत टप्पा ३<br>वयोगट ५-६ वर्षे |
|---|---|

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

## स्वच्छता व आरोग्य

**क्षमता २ - असुरक्षित/धोकादायक परिस्थिती समजून घेऊन मदत करणे.**
**अ.नि २ -** घरी, शाळेत आणि खेळण्याच्या मैदानावर सुरक्षिततेचे पायाभूत नियम पाळतो का?

**क्षमता ३ - असुरक्षित/धोकादायक परिस्थिती समजून घेऊन मदत करणे.**
**अ.नि ३ -** चांगले स्पर्श वाईट स्पर्श समजतात का? आणि अनोळखी आणि अपरिचित व्यक्तींपासून दूर राहतो का?



**क्षमता ४ - ★ प्राथमिक व द्वितीय रंगछटा फरक समजणे, लांबी, रुंदी, उंची या मितीचे आकार, रंग आणि त्याच्या छटा यामधील फरक ओळखणे.**

**★ चिन्हे, प्रतिके यांकरिता दृकस्मृती विकसित करणे.**

**★ आवाजातील चढ-उतार, सूर-ताल-लय यानुसार आवाजातील फरक ओळखणे.**

**★ वेगवेगळे गंध/चव यांतील फरक ओळखणे.**

**★ विविध प्रकारच्या स्पर्शामधील फरक करण्याची क्षमता विकसित होणे.**

**★ अनुभवांची सर्वंकष जाणीव होण्यासाठी ज्ञानेंद्रियांमार्फत प्राप्त संवेदनांचे एकात्मिकरण करण्यास सुरुवात करणे.**

**अ.नि ४ -** मी आपल्या ज्ञानेंद्रियांचा वापर करुन सभोवतालच्या परिसराचे निरिक्षण करुन त्याचे अन्वेषण करतो का?





## माझा सामाजिक आणि भावनिक विकास - मनोमय कोश
## Socio-Emotional Development

⬇

**रा.अ.आ - 2022 - CGs**

**अभ्यासक्रमाची ध्येये**

**CG - 4** बालके भावनिक बुद्धिमत्ता विकसित करतात म्हणजे त्यांनी स्वतःच्या भावना समजून घेऊन त्यांचे व्यवस्थापन करण्याची आणि सामाजिक नियमांना सकारात्मक प्रतिसाद देण्याची क्षमता होय.

**CG - 5** बालके उत्पादक कार्याबाबत व सेवांबाबत सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतात.

**CG - 6** बालके स्वत:भोवतालच्या नैसर्गिक वातावरणाबद्दल कृतज्ञताभाव दर्शवितात.

**CG - 13** बालके अध्ययनाच्या सवयी विकसित करतात. यामुळे त्यांना शालेय वर्गासारख्या औपचारिक अध्ययन वातावरणात सक्रिय राहता येते.

⬇

**निपुण विकासात्मक ध्येये - DGs**

**विकासात्मक ध्येय १ - DG1 - चांगले आरोग्य आणि कल्याण**

**विकासात्मक ध्येय ३ - DG3 - मुलं सहभागी अध्ययनार्थी व्हावीत.**

यानुसार

**सामाजिक आणि भावनिक विकास क्षेत्रातील** माझ्यामध्ये अपेक्षित **क्षमता** आणि त्या क्षमता पडताळणीच्या **वयानुसार अपेक्षित अध्ययन निष्पत्ती** पहा...

| माझा सामाजिक आणि भावनिक विकास - मनोमय कोश<br>Socio-Emotional Development | पायाभूत टप्पा १<br>वयोगट ३-४ वर्षे |
|---|---|

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

**क्षमता १ - ★ सकारात्मक स्वप्रतिमा - स्वप्रतिमेच्या कल्पनेबाबतचे सातत्य, त्यातील बदल ओळखून त्याची जाणीव होणे.**
**★ स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वत:ला ओळखणे.**



**अ.नि १ -** स्वत:बद्दल काही शारिरीक वैशिष्ट्ये सांगण्यास सुरुवात केली आहे का?

**क्षमता २ - कुटुंब व समाजाचा एक घटक या नात्याने स्वत:ची ओळख निर्माण होणे.**

**अ.नि २ -** लगतच्या कुटुंबाला ओळखतो का?

**क्षमता ३ - इतरांना मदत करण्यासाठी वयानुरुप सुयोग्य शारीरिक श्रम करण्याची तयारी दर्शवणे आणि त्यामध्ये सहभागी होणे.**



**अ.नि ३ -** वर्गातील कुठल्याही कृतीत भाग घेतो का आणिवर्ग कृतीत पुढाकार घेतो का?

**क्षमता ४ - शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करणे.**

**अ.नि ४ -** खेळ किंवा वर्गकृती करताना आपला नंबर येईपर्यंत वाट पहातो का?

**क्षमता ५ - शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करणे.**



**अ.नि ५ -** सोप्या नियमांचे पालन करतो का?

## क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (Competencies and Learning Outcomes)



**क्षमता ६ - विविध भावना ओळखणे. त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे.**

**अ.नि ६ -** स्वतःच्या भावना शब्दात किंवा इतर प्रकारे व्यक्त करतो का ? जसे चित्रांमधून, काही लकबींमधून, आवडनिवड सांगतो प्राधान्य सांगतो.



**क्षमता ७ - इतर बालके आणि प्रौढ यांच्याशी सहजतेने संवाद साधणे.**

**अ.नि ७ -** मोठ्यांच्या मदतीने छोटे संघर्ष सोडवतो का ?

**क्षमता ८ - इतर बालकांबरोबर सहकार्य वृत्तीने वागणे.**

**अ.नि ८ -** दुसऱ्या मुलांबरोबर खेळताना आणि काम करताना आनंद व्यक्त करतो का ?





**क्षमता ९ - इतर बालकांबरोबर सहकार्य वृत्तीने वागणे.**

**अ.नि ९ -** दुसऱ्या मुलांना मदत करतो का ?
त्यांची काळजी घेतो का ?
त्यांच्याबरोबर आपल्या गोष्टी वाटून घेतो का ?

**क्षमता १० - इतर बालकांचे विचार, त्यांचे प्राधान्य व भावनिक गरजा लक्षात घेवून त्यांना सकारात्मक प्रतिसाद देणे.**





**अ.नि - १०.** मी वर्गातील विविधतेबद्दल संवेदनशीलता दाखवतो का ?
त्यांना सामावून घेतो का ? जसे क्षमता नसलेले किंवा वेगवेगळ्या घरातून आलेले या विषयी संवेदनशीलता दाखवतो का ?

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (Competencies and Learning Outcomes)



**क्षमता १ - सकारात्मक स्वप्रतिमा -**
**स्वप्रतिमेच्या कल्पनेबाबतचे सातत्य, त्यातील बदल ओळखून त्याची जाणीव होणे.**

**अ.नि १ -** स्वतःबद्दल काही शारिरीक वैशिष्ट्ये सांगण्यास सुरुवात केली आहे का?

**क्षमता २ - स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःला ओळखायला सुरुवात करणे.**

**अ.नि २ -** स्वतःची आवडनिवड सांगतो का? प्राधान्य सांगतो आणि त्यानुसार निवड करतो का?

**क्षमता ३ - ★ कुटुंब व समाजाचा एक घटक या नात्याने स्वतःची ओळख निर्माण होणे.**
**★ स्वतःला कुटुंब, शेजारी, शाळा यांचा एक घटक म्हणून ओळखणे.**
**★ स्वतःच्या ओळखीबाबत इतर माहिती देणे.**

**अ.नि ३ -** लगतच्या कुटुंबाला, मित्राला, शेजाऱ्यांना ओळखतो का?



# माझा सामाजिक आणि भावनिक विकास - मनोमय कोश
# Socio-Emotional Development

**पायाभूत टप्पा २**
**वयोगट ४-५ वर्षे**

## क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (Competencies and Learning Outcomes)





**क्षमता ४ - ★ इतर मुलांबरोबर सहकार्य वृत्तीने वागणे.**
**★ इतर मुलांबरोबर खेळायला सुरुवात करणे,**
**इतर मुलांबरोबर खेळताना आनंद घेणे.**
**★ इतर मुलांबरोबर दैनंदिन कृतीत**
**सहभागी होणे, त्याचा आनंद घेणे.**
**अ.नि ४ -** वर्गात व इतर मुलांबरोबर जुळवून घेतो का?



**क्षमता ५ - ★ शाळेत/वर्गात/घरी सामाजिक नियम**
**समजून घेवून सकारात्मक वर्तन करणे.**
**★ साध्या लहान सूचनांचे पालन करणे.**
**अ.नि ५ -** सूचना पाळतो का?





**क्षमता ६ - ★ स्वतःच्या विविध भावना ओळखणे,**
**त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे.**
**★ इतरांच्या भावनिक अवस्था समजून घेणे, यामुळे**
**सहानुभूती, सहिष्णूता या भावना विकसित होण्यास मदत होणे.**
**★ सोप्या भावना ओळखता येणे.**
**अ.नि ६ -** प्रसंगाला अनुरुप अशा भावना व्यक्त करतो का?



**क्षमता ७ - सामाजिक नियम समजूण घेवून त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करणे.**
**अ.नि ७ -** सुरु केलेले काम पूर्ण करतो का?

| माझा सामाजिक आणि भावनिक विकास - मनोमय कोश<br>Socio-Emotional Development | पायाभूत टप्पा २<br>वयोगट ४-५ वर्षे |
|---|---|

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (Competencies and Learning Outcomes)

**क्षमता ८ - इतर बालकांबरोबर सहकार्य वृत्तीने वागणे.**

**अ.नि ८ -** वादावर तोडगा सांगतो(मार्गदर्शनाने) का?




**क्षमता ९ - इतर बालके/प्रौढ यांच्याशी संवाद साधणे.**

**अ.नि ९ -** दुसऱ्या मुलांबरोबर समन्वयाने खेळतो का?



**क्षमता १० - इतर मुलांबरोबर सहजतेने संवाद साधणे, सहकार्य वृत्तीने वागणे.**

**अ.नि १० -** काय व कसं खेळायचे याबद्दलचे नियोजन ठरवतो का?

**क्षमता ११ - सर्व प्रकारच्या जीवांबाबत काळजी वाहणे/त्यांच्याबरोबर राहण्याबाबत आनंद प्रकट करणे.**




**अ.नि ११ -** दुसऱ्याची काळजी वाहणे दर्शवतो का?
(मिठी मारणे, थोपटणे, मुका घेणे) तसेच
आपल्या वस्तू दुसऱ्यांबरोबर वाटून घेतो का?

**क्षमता १२ - इतर मुलांचे विचार, त्यांचे प्राधान्य व भावनिक गरजा लक्षात घेवून त्यांना सकारात्मक प्रतिसाद देणे.**

**अ.नि १२ -** वर्गातील विविधतेबद्दल संवेदनशीलता दाखवतो का? त्यांना सामावून घेतो का?
जसे वेगळ्या गरजा असलेल्या वेगवेगळ्या पार्श्वभूमीतून आलेल्यांबाबत.




## क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (Competencies and Learning Outcomes)



**क्षमता १ - सकारात्मक स्वप्रतिमा -**
**स्वप्रतिमेच्या कल्पनेबाबतचे सातत्य, त्यातील बदल ओळखून त्याची जाणीव होणे.**
**अ.नि १** - स्वतःबद्दल आणि इतरांबद्दल काही शारिरीक वैशिष्ठ्ये लिंग ओळख, आवडीनिवडी इत्यादी बद्दल सांगता येते का?

**क्षमता २ - कुटुंब व समाजाचा एक घटक या नात्याने स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःला ओळखायला सुरुवात करणे.**
**अ.नि २** - लांबच्या नात्यांबद्दलही समज दाखवतो का?

**क्षमता ३ - शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करणे.**
**अ.नि ३** - आपल्या सर्व कृती स्वतंत्रपणे करता येतात का?



**क्षमता ४ - इतर बालकांबरोबर सहकार्य वृत्तीने वागणे.**
**अ.नि ४** - खेळातील नियम पाळतो का?



**क्षमता ५ - विविध भावना ओळखणे, त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे.**
**अ.नि ५** - दिनचर्येतील बदल सहज स्विकारतो का?

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

**क्षमता ६ - शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करणे.**

**अ.नि ६** - रोजच्या दिनचर्येत सातत्य असते का? तसेच लक्ष देण्याच्या कालावधीत वाढ जाणवते का?



**क्षमता ७ - विविध भावना ओळखणे, त्यावर नियंत्रण आणण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे.**

**अ.नि ७** - आव्हानात्मक प्रसंगीही आपल्या भावनांवर ताबा राखता येतो का?



**क्षमता ८ - ★ कुटुंब व समाजाचा एक घटक या नात्याने स्वतंत्र व्यक्ती म्हणून स्वतःला ओळखायला सुरुवात करणे.**

**★ शाळेत आणि वर्गात सामाजिक नियम समजून घेऊन त्याप्रमाणे सकारात्मक वर्तन करणे.**

**अ.नि ८** - जबाबदारी घेतो का? आणि स्वतःच्या आवड आणि प्राधान्यानुसार एखाद्या गोष्टीची निवड करतो का?

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (Competencies and Learning Outcomes)

**क्षमता ९ - इतर बालकांबरोबर सहकार्य वृत्तीने वागणे.**

**अ.नि ९ -** वादावर तोडगा सांगतो का?तसेच गटात काम करताना किंवा खेळताना जुळवून घेतो का?



**क्षमता १० - इतर बालके आणि प्रौढ यांच्याशी सहजतेने संवाद साधणे.**

**अ.नि १० -** खेळताना किंवा एकमेकांशी संवाद साधताना दुसऱ्यांच्या कल्पना मान्य करण्याची इच्छा दर्शवतो का?



**क्षमता ११ - गरजेच्या वेळी इतरांना मदत करणे आणि दयाभाव दर्शविणे.**

**अ.नि ११ -** मोठ्या आणि लहान गटांमध्ये कृती करताना आपल्या सवंगड्यांना मदत हवी असेल तर करतो का?



**क्षमता १२ - इतर बालकांचे विचार, त्यांचे प्राधान्य व भावनिक गरजा लक्षात घेऊन त्यांना सकारात्मक प्रतिसाद देणे.**

**अ.नि १२ -** वर्गातील विविधतेबद्दल जसे वेगळ्या गरजा असलेल्या, वेगवेगळ्या पार्श्वभूमीतून आलेल्या मुलांबाबत संवेदनशीलता दाखवतो का?
आणि त्यांना सामावून घेतो का?



## माझा बौध्दिक विकास - विज्ञानमय कोश
## Cognititve Development

⬇

**रा.अ.आ - 2022 - CGs**

**अभ्यासक्रमाची ध्येये**

**CG - 7** बालके निरीक्षण व तार्किक विचाराने सभोवतालच्या जगाची जाणीव करून घेतात.

**CG - 8** बालके प्रमाण, आकार व मोजमापे या गणितीय आकलन आणि क्षमतेद्वारे सभोवतालचे जग समजून घेण्याची क्षमता विकसित करतात.

⬇

**निपुण विकासात्मक ध्येय - DGs**

**विकासात्मक ध्येय ३ - DG3 - मुलं सहभागी अध्ययनार्थी व्हावीत.**

यानुसार

**बौध्दिक विकास क्षेत्रातील** माझ्यामध्ये अपेक्षित **क्षमता** आणि त्या क्षमता पडताळणीच्या **वयानुसार अपेक्षित अध्ययन निष्पत्ती** पहा...

| माझा बौध्दिक विकास - विज्ञानमय कोश<br>Cognititve Development | पायाभूत टप्पा १<br>वयोगट ३-४ वर्षे |
|---|---|

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

**क्षमता १ - स्मृती आणि मानसिक लवचिकता - नियंत्रित वातावरणामध्ये अध्ययनाला मदत होण्यासाठी योग्य कार्यकारी स्मृती, मानसिक लवचिकता स्वयं- नियंत्रण विकसित करणे. स्मरणशक्तीचा खेळ आणि जोड्या लावा खेळ खेळणे.**

**अ.नि १ -** एका वेळेला बघितलेल्या २/३ गोष्टी स्मरणात ठेवतो का?




**क्षमता २ - ★ वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करणे व समजून घेणे.**

**★ परिचित वस्तूच्या चित्रातील हरवलेला भाग ओळखणे.**

**अ.नि २ -** नेहमीच्या वस्तूचा गायब झालेला भाग माझ्या लक्षात येतो का?



**क्षमता ३ - ★ आपल्या परिसरातील आकार आणि संख्या यांच्या आधारे साधे आकृतीबंध ओळखणे आणि त्याचा विस्तार करणे.**

**★ पुनरावृत्तीनुसार आकृतीबंध तयार करणे.**



**(आकार, पाने, फुले यांचा)**

**अ.नि ३ -** मी सोपा आकृतीबंध करु शकतो का? किंवा पुनरावृत्ती करु शकतो का?

| माझा बौध्दिक विकास - विज्ञानमय कोश<br>Cognititve Development | पायाभूत टप्पा १<br>वयोगट ३-४ वर्षे |
| --- | --- |

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

**क्षमता ४ - चढत्या आणि उतरत्या क्रमाने मांडणी करणे.**

**अ.नि ४ -** मी २/३ वस्तू किंवा चित्रपत्ते क्रमाने लावू शकतो का?



**क्षमता ५ - एकापेक्षा जास्त गुणधर्माच्या आधारे वस्तू गटात/उपगटात वेगळ्या करणे.**

**अ.नि ५ -** मला एका गुणधर्मावरुन वर्गीकरण करता येते का?



**क्षमता ६ - एखादी गोष्ट पहिल्यांदा करता न आल्यास प्रौढ व्यक्तींच्या मदतीने दुसरा मार्ग स्विकारुन बोधात्मक लवचिकता दर्शविणे. (उदा. पहिल्या प्रयत्नांमध्ये उंचावर चढणे शक्य न झाल्यास दुसरा मार्ग वापरणे.)**

**अ.नि ६ -** मी रोजच्या जीवनातील सोप्या समस्या स्वतः सोडवू शकतो का? किंवा मोठ्यांच्या मदतीने सोडवतो का?

**क्षमता ७ - वेगवेगळ्या गटातील/वर्गातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध याचे निरिक्षण करणे व समजून घेणे.**

**अ.नि ७ -** पाहुणा, आख्खा व त्याचा अर्धा काहीतरी साधर्म्य असलेल्या गोष्टी असे मी ओळखू शकतो का?



# माझा बौध्दिक विकास - विज्ञानमय कोश
## Cognititve Development

**पायाभूत टप्पा १**
**वयोगट ३-४ वर्षे**

**क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (Competencies and Learning Outcomes)**

**क्षमता ८- एकापेक्षा जास्त गुणधर्माच्या आधारे वस्तू गटात/उपगटात वेगळ्या करणे.**
**अ.नि ८ -** दोन वस्तूंमध्ये गुणधर्मानुसार तुलना करु शकतो का? लहान-मोठा, कमी-जास्त, उंच-बुटका, जड-हलकं, गार-गरम.

**कमी - जास्त** **लहान - मोठा** **जड - हलकं**



**क्षमता ९ - मूलभूत भौमितिक आकार ओळखणे, ते तयार करणे व त्याचे वर्गीकरण करणे.**
**अ.नि ९ -** मूळ रंग व आकार ओळखतो आणि त्यांची नावे सांगतो का?.



**क्षमता १० - संख्यानामे व वस्तू यांची ५ पर्यंत एकास-एक संगती लावणे.**
**अ.नि १० -** ३/४ वस्तूंची एकास-एक संगती लावतो का?



**क्षमता ११ -★ संख्येबाबतची समज दर्शविणे.**
**★ अंकाचे मूल्य समजून घेऊन वस्तूंची मोजणी करणे.**
**अ.नि ११ -** मी १ ते ३ मोजणी करुन तेवढया वस्तू देऊ शकतो का?



**१** **2** **3**

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

# परिसर

**क्षमता १ - वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करणे व समजून घेणे.**

**अ.नि १ -** मी नेहमीच्या वस्तू, आवाज, माणसे, चित्र, प्राणी, पक्षी, घटना ओळखतो का? आणि त्यांची नावे सांगतो का?

**क्षमता २ -★ अनुभवांची सर्वकष जाणीव होण्यासाठी ज्ञानेंद्रियांमार्फत प्राप्त संवेदनांचे एकत्रीकरण करणे.**

**★ निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन तो दर्शवणारा साध्या परिकल्पना मांडणे व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता/पडताळणीकरता निरीक्षणाचा आधार घेणे.**



**अ.नि २ -** मी लगतच्या परिसराबाबत उत्सुकता दाखवतो का? आणि त्या अनुषंगाने प्रश्न विचारतो का?

**क्षमता ३ - दैनंदिन जीवनातील परिस्थितीमध्ये व अध्ययन करण्यासाठी सुयोग्य साधने व तंत्रज्ञान वापरणे.**



**अ.नि ३ -** मी टीव्ही किंवा स्मार्ट बोर्ड वरची गाणी, कविता यांचा आस्वाद घेतो का?

**क्षमता ४ - सर्व प्रकारच्या जीवांबाबत काळजी घेणे व त्यांच्यासोबत राहण्याबाबत आनंद प्रकट करणे.**



**अ.नि ४ -** मी पर्यावरणाबाबत संवेदनशीलता व जागरुकता दाखवतो का? जसे पाणी वाया घालवू नये, घाण करु नये, प्राण्यांना त्रास देऊ नये इ.

# माझा बौध्दिक विकास - विज्ञानमय कोश
# Cognititve Development

**पायाभूत टप्पा २**
**वयोगट ४-५ वर्षे**

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

**क्षमता १ - स्मृती आणि मानसिक लवचिकता - नियंत्रित वातावरणामध्ये अध्ययनाला मदत होण्यासाठी योग्य कार्यकारी स्मृती, मानसिक लवचिकता स्वयं-नियंत्रण विकसित करणे. स्मरणशक्तीचा खेळ आणि जोड्या लावा खेळ खेळणे.**

**अ.नि १ -** एका वेळेला बघितलेल्या ३/४ वस्तू स्मरणात ठेवतो का?









**क्षमता २ - वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करणे व समजून घेणे.**

**अ.नि २ -** मला नेहमीच्या ओळखीच्या वस्तूचे गायब ३-५ भाग लक्षात येतात का?



**क्षमता ३ - ★ आपल्या परिसरातील आकार आणि संख्या यांच्या आधारे साधे आकृतीबंध ओळखणे आणि त्याचा विस्तार करणे.**

**★ पुनरावृत्ती असणारा आकृतीबंधातील घटक ओळखणे.**

**★ ३-४ वस्तू, आकार, चित्र यांना वापरुन आकृतीबंध तयार करणे.**

**★ आवाज किंवा विशिष्ठ कृतींमधील आकृतीबंध ओळखणे.**

**अ.नि ३ -** मी सोप्या आकृतीबंधातील पुनरावृत्ती ओळखू शकतो का? आणि त्याप्रमाणे पुढे आकृतीबंध तयार करु शकतो का?



# माझा बौध्दिक विकास - विज्ञानमय कोश
# Cognititve Development

**पायाभूत टप्पा २**
**वयोगट ४-५ वर्षे**

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)



**क्षमता ४ - ★ चढत्या आणि उतरत्या क्रमाने ९९ पर्यंतच्या संख्यांची मांडणी करणे.**
**★ ३ स्तरांपर्यंत आकाराच्या आधारावर वस्तूंचीक्रमवारी लावणे आणि त्याचे स्तर शब्दबध्द करणे.**
**★ परिचित घटना, वस्तू क्रमाने मांडणे.**
**अ.नि ४ -** ३/४ वस्तू किंवा चित्रपत्ते क्रमाने लावू शकतो का?

**क्षमता ५ - वेगवेगळ्या गटातील/वर्गातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध याचे निरिक्षण करणे व समजून घेणे.**




**अ.नि ५ -** पाहुणा, आख्खा व त्याचा अर्धा किंवा काहीतरी साधर्म्य असलेल्या गोष्टींचे संबंध ओळखण्याची क्षमता दाखवतो का?

**क्षमता ६ - ★ एकापेक्षा जास्त गुणधर्मांच्या आधारे वस्तू गटात/उपगटात वेगळ्या करणे.**
**★ मूलभूत भौमितिक आकार ओळखणे, वर्गीकरण करणे, समजून घेणे आणि समजावून सांगणे.**
**अ.नि ६ -** आकार, आकारमान किंवा रंग व आकार अशा कोणत्याही दोन गुणधर्मांनुसार वर्गीकरण व तुलना करु शकतो का?

**क्षमता ७ -★ १०-२० टप्प्याने ९९ पर्यंतच्या संख्या मोजणे.**
**★ वस्तूंचे डावीकडून-उजवीकडे व विरुध्द बाजूने क्रमागत स्थान यांची समज दर्शविणे.**
**अ.नि ७ -** मी दुसरा-तिसरा असे स्थान दर्शवणारे शब्द बरोबर वापरु शकतो का?

| माझा बौध्दिक विकास - विज्ञानमय कोश<br>Cognititve Development | पायाभूत टप्पा २<br>वयोगट ४-५ वर्षे |
| --- | --- |

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

**क्षमता ८ -★ चढत्या आणि उतरत्या क्रमाने ९९ पर्यंतच्या संख्यांची मांडणी करणे.**

**★ ३ स्तरांपर्यंत आकाराच्या आधारावर वस्तूंची क्रमवारी लावणे आणि त्याचे स्तर शब्दबध्द करणे.**

**★ परिचित घटना, वस्तू क्रमाने मांडणे.**

**अ.नि ८ -** एका गुणधर्मानुसार ३ वस्तूंची क्रमाने मांडणी करु शकतो का ?

**क्षमता ९ - संख्यानामे व वस्तू यांची ५ पर्यंत एकास-एक संगती लावणे.**

**अ.नि ९ -** ४/५ वस्तूंची एकास-एक संगती लावू शकतो का ?.



**क्षमता १० - ★ संख्यानामे व वस्तू यांची ५ पर्यंत एकास-एक संगती लावणे.**

**★ अंकाचे मूल्य समजून घेऊन वस्तूंची मोजणी करणे.**

**★ संख्येबाबतची समज दर्शविणे.**

**★ ५ पर्यंत मूर्त बाबी, सुट्या वस्तू व अमूर्त गोष्टी सहजतेने मोजणे.**

**अ.नि १० -** १ ते १० अंकचिन्ह ओळखू शकणे व १ ते १०मोजणी करुन तेवढया वस्तू देणे.



क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (Competencies and Learning Outcomes)

# परिसर

**क्षमता १ -★ अनुभवांची सर्वकष जाणीव होण्यासाठी ज्ञानेंद्रियांमार्फत प्राप्त संवेदनांचे एकत्रीकरण करणे.**



**★ निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारणभाव समजून घेऊन तो दर्शवणारी साध्या परिकल्पना मांडणे व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता/ पडताळणीकरता निरीक्षणाचा आधार घेणे.**

**अ.नि १ -** एखाद्या प्रयोगाचा आनंद घेतो का? व त्याच्या लगतच्या भौतिक, सामाजिक आणि जैविक वातावरणाबाबत स्पष्टीकरण मागतो का?

**क्षमता २ - वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करणे व समजून घेणे.**



**अ.नि २ -** मी लगतच्या परिसराबाबत उत्सुकता दाखवतो का? त्या अनुषंगाने प्रश्न विचारतो आणि त्याबाबतच्य संकल्पना विकसित करता येतात का?

**क्षमता ३ - वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करणे व समजून घेणे.**

**अ.नि ३ -** मी नेहमीच्या वस्तू, आवाज, माणसे, चित्र, प्राणी, पक्षी, घटना यांचे वर्णन करतो का?

**क्षमता ४ - दैनंदिन जीवनातील परिस्थितीमध्ये व अध्ययन करण्यासाठी सुयोग्य साधने व तंत्रज्ञान वापरणे.**

**अ.नि ४ -** तांत्रिकबाबींबाबत जागरुकता दाखवतो का?

# परिसर

**क्षमता ५ - ★ सर्व प्रकारच्या जीवांबाबत काळजी घेणे व त्यांच्यासोबत राहण्याबाबत आनंद प्रकट करणे.**
**★ विनाकारण झाडे, प्राणी यांना त्रास न देणे.**
**★ पाणी वाया न घालवणे.**



**अ.नि ५ -** मी पर्यावरणाबाबत संवेदनशीलता व जागरुकता दाखवतो का? जसे पाणी वाया घालवू नये घाण करु नये प्राण्यांना त्रास देऊ नये इ.

**क्षमता ६ - ५ वाक्यापर्यंत छोट्या गोष्टी लक्षात ठेवून म्हणून दाखविणे.**
**अ.नि ६ -** घटना किंवा गोष्ट क्रमाने सांगू शकतो का?

**क्षमता ७ - ★ ५वाक्यापर्यंत छोट्या गोष्टी लक्षात ठेवून म्हणून दाखविणे.**
**★ एखादी गोष्ट पहिल्यांदा करता न आल्यास प्रौढ व्यक्तींच्या मदतीने दुसरा मार्ग स्विकारुन बोधात्मक लवचिकता दर्शविणे. (उदा. पहिल्या प्रयत्नांमध्ये उंचावर चढणे शक्य न झाल्यास दुसरा मार्ग वापरणे.)**
**अ.नि ७ -** सोप्या समस्यांना उपाय सांगू शकतो का?

**क्षमता ८ - अवधान आणि हेतूपरस्सर कृती नियोजन - अवधान आणि विशिष्ट ध्येय प्राप्तीसाठी कृती करणे अशी कौशल्ये संपादित करणे.**
**अ.नि ८ -** मी एखाद्या घटनेचा विचार करतो, त्याचे विश्लेषण करतो आणि त्यानुसार कृती करतो का?

**माझा बौध्दिक विकास - विज्ञानमय कोश**
**Cognititve Development**

**पायाभूत टप्पा ३**
**वयोगट ५-६ वर्षे**

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

**क्षमता १ - ★ आपल्या परिसरातील आकार आणि संख्या यांच्या आधारे साधे आकृतीबंध ओळखणे आणि त्याचा विस्तार करणे.**

**★ पुनरावृत्ती असणारा आकृतीबंधातील घटक ओळखणे.**

**★ ३-४ वस्तू, आकार, चित्र यांना वापरुन आकृतीबंध तयार करणे.**

**★ आवाज किंवा विशिष्ठ कृतींमधील आकृतीबंध ओळखणे.**

**अ.नि १ -** मी नवा आकृतीबंध तयार करु शकतो का?



**क्षमता २ - ★ चढत्या आणि उतरत्या क्रमाने ९९ पर्यंतच्या संख्यांची मांडणी करणे.**

**★ ३ स्तरांपर्यंत आकाराच्या आधारावर वस्तूंची क्रमवारी लावणे आणि त्याचे स्तर शब्दबध्द करणे.**

**★ परिचित घटना, वस्तू क्रमाने मांडणे.**

**अ.नि २ -** मला ४/५ वस्तू किंवा चित्रपत्ते क्रमाने लावता येतात का?.



**क्षमता ३ - ★ एकपेक्षा जास्त गुणधर्माच्या आधारे वस्तू गटात/उपगटात वेगळ्या करणे.**

**★ मूलभूत भौमितिक आकार ओळखणे, वर्गीकरण करणे, समजून घेणे आणि समजावून सांगणे.**

**अ.नि ३ -** मला एकाचवेळी दोन किंवा जास्त गुणधर्मानुसार तुलना व वर्गीकरण करता येणे जसे रंग, आकार, आकारमान.

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (Competencies and Learning Outcomes)

**क्षमता ४ - वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करणे व समजून घेणे.**

**अ.नि ४ -** पाहुणा, आख्खा व त्याचा अर्धा तसेच काहीतरी साधर्म्य असलेल्या गोष्टींचे संबंध ओळखण्याची क्षमता दाखवतो का?



**क्षमता ५- अवधान आणि हेतूपुरस्सर कृती नियोजन - अवधान आणि विशिष्ट ध्येय प्राप्तीसाठी कृती करणे अशी कौशल्ये संपादित करणे.**

**अ.नि ५ -** मी कारणं देतो, विश्लेषण करतो, अंदाज बांधतो, निष्कर्ष काढतो, अर्थ लावतो का?

**क्षमता ६ - संख्यांची जोड व फोड आणि संख्यांचे गट करणे यांसारख्या लवचिक कार्यनीतींचा वापर करुन दोन अंकी संख्यांची बेरीज आणि वजाबाकी अचूक करणे. (बेरीज व वजाबाकी वस्तूरुपी संकल्पना समज विकसित करणे.)**

**अ.नि ६ -** ९ पर्यंत वस्तूंचे दोन गट एकत्र करणे व पुन्हा मोजणे. तसेच वस्तूंच्या गटातून ९ पर्यंतच्या वस्तू बाजूला काढणे व पुन्हा मोजणे.

**क्षमता ७ - चढत्या आणि उतरत्या क्रमाने ९९ पर्यंतच्या संख्यांची मांडणी करणे.**

**अ.नि ७ -** एका गुणधर्मानुसार ५ वस्तूंची क्रमाने मांडणी करु शकतो का?



क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (Competencies and Learning Outcomes)

**क्षमता ८ - १० आणि २० या टप्प्याने ९९ पर्यंतच्या संख्या (पुढे आणि मागे) दोन्ही मोजणे.**

**अ.नि ८ -** १ ते २० मोजणी करुन तेवढया वस्तू देऊ शकतो का ?




**क्षमता ९ - ★ १० आणि २० या टप्प्याने ९९ पर्यंतच्या संख्या (पुढे आणि मागे) दोन्ही मोजणे.**

**★ संख्यानामे व वस्तू यांची ५ पर्यंत एकास-एक संगती लावणे.**

**अ.नि ९ -** दिलेल्या संचातील वस्तूंची कोणत्याही क्रमाने मोजणी करणे आणि समजून घेणे की कोणत्याही क्रमाने मोजणी केली तरी वस्तूंची संख्या समानच राहते.

**क्षमता १० -_स्थानिक किमतीचा वापर करुन ९९ पर्यंतच्या संख्या दर्शविण्यासाठी संख्या चिन्हांचा वापर करणे आणि संख्या ओळखणे.**

**अ.नि १० -** ३० पर्यंतचे अंकचिन्ह ओळखतो आणि लिहितो का ?

# परिसर

**क्षमता १ - ★ अनुभवांची सर्वकष जाणीव होण्यासाठी ज्ञानेंद्रियांमार्फत प्राप्त संवेदनांचे एकात्मीकरण करणे.**
**★ निसर्गाच्या निरीक्षणातून कार्यकारण भाव समजून घेऊन तो दर्शवणारी साध्या परिकल्पना मांडणे व त्याच्या स्पष्टीकरणाकरिता/पडताळणीकरता निरीक्षणाचा आधार घेणे.**



**अ.नि १ -** वातावरणातील वस्तूंची हाताळणी आणि तपासणी करण्यात गुंततो का?
(प्रश्न विचारतो, चौकशी करतो, शोधतो, स्वतः कल्पना तयार करतो आणि अंदाज बांधतो).

**क्षमता २ - वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करणे व समजून घेणे.**
**अ.नि २ -** नेहमीच्या वस्तू, आवाज, माणसे, चित्र, प्राणी, पक्षी, घटना यांचे सूक्ष्म निरिक्षण आणि बारिक सारिक तपशिलासह वर्णन करतो का?

**क्षमता ३ - वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करणे व समजून घेणे.**



**अ.नि ३ -** माझ्या नेहमीच्या ओळखीच्या वस्तूचे गायब ३-५ भाग लक्षात येतात का?

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

# परिसर

**क्षमता ४ - ★ स्मृती आणि मानसिक लवचिकता - नियंत्रित वातावरणामध्ये अध्ययनाला मदत होण्यासाठी योग्य कार्यकारी स्मृती, मानसिक लवचिकता स्वयं-नियंत्रण विकसित करणे.**

**★ स्मरणशक्तीचा खेळ आणि जोड्या लावा खेळ खेळणे.**

**अ.नि ४ -** एका वेळेला बघितलेल्या ४/५ वस्तू स्मरणात ठेवतो व सांगतो का?




**क्षमता ५ - ★ स्मृती आणि मानसिक लवचिकता -**
**नियंत्रित वातावरणामध्ये अध्ययनाला मदत होण्यासाठी योग्य कार्यकारी स्मृती, मानसिक लवचिकता स्वयं- नियंत्रण विकसित करणे.**

**★ स्मरणशक्तीचा खेळ आणि जोड्या लावा खेळ खेळणे.**

**अ.नि ५ -** मी घटना किंवा गोष्ट क्रमाने सांगू शकतो का?



# परिसर

**क्षमता ६ - ★ स्मृती आणि मानसिक लवचिकता - नियंत्रित वातावरणामध्ये अध्ययनाला मदत होण्यासाठी योग्य कार्यकारी स्मृती, मानसिक लवचिकता स्वयं-नियंत्रण विकसित करणे.**

**★ स्मरणशक्तीचा खेळ आणि जोड्या लावा खेळ खेळणे.**

**अ.नि ६ -** सोप्या समस्यांना कारणासह उपाय सांगू शकतो का?

**क्षमता ७ - वेगवेगळ्या वर्गातील/गटातील वस्तूंमधील फरक व वस्तूंचा एकमेकांशी संबंध यांचे निरीक्षण करणे व समजून घेणे.**

**अ.नि ७ -** मी लगतच्या भौतिक, सामाजिक आणि जैविक वातावरणाबाबत उत्सुकता दर्शवतो का? आणि त्या अनुषंगाने प्रश्न विचारतो का? आणि त्याबाबतच्या संकल्पना विकसित करता येतात का?

**क्षमता ८ - ★ सर्व प्रकारच्या जीवांबाबत काळजी घेणे व त्यांच्यासोबत राहण्याबाबत आनंद प्रकट करणे.**

**★ विनाकारण झाडे, प्राणी यांना त्रास न देणे.**

**★ पाणी वाया न घालवणे.**



**अ.नि ८ -** मी पर्यावरणाबाबत संवेदनशीलता व जागरुकता दाखवतो का? जसे पाणी वाया घालवू नये, घाण करु नये, प्राण्यांना त्रास देऊ नये इ.

**क्षमता ९ - दैनंदिन जीवनातील परिस्थितीमध्ये व अध्ययन करण्यासाठी सुयोग्य साधने व तंत्रज्ञान वापरणे.**

**अ.नि ९ -** मी तांत्रिकबाबींबाबत जागरुकता दाखवतो का?

**माझा भाषा विकास - प्राणिक विकास**
**Language and literacy Development**

↓

**रा.अ.आ - 2022 - CGs**

**अभ्यासक्रमाची ध्येये**

**CG - 9** बालके दोन भाषांमध्ये दैनंदिन संवाद साधण्यासाठी प्रभावी संवाद कौशल्ये विकसित करतात.

**CG - 10** बालके भाषा एक (L1) मध्ये सफाईदारपणे वाचन व लेखन करतात.

**CG - 11** बालके भाषा दोन (L2) मध्ये वाचन आणि लेखनाचा आरंभ करतात.

↓

**निपुण विकासात्मक ध्येये - DGs**

**विकासात्मक ध्येय २ - DG2 - मुलं उत्तम संवादक व्हावीत.**

यानुसार
**भाषा विकास क्षेत्रातील**माझ्यामध्ये अपेक्षित **क्षमता** आणि त्या क्षमता पडताळणीच्या **वयानुसार अपेक्षित अध्ययन निष्पत्ती** पहा...

| माझा भाषा विकास - प्राणिक विकास<br>Language and literacy Development | पायाभूत टप्पा १<br>वयोगट ३-४ वर्षे |
|---|---|

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

## श्रवण - ऐकणे



**क्षमता १ - मौखिक सूचना समजून घेणे.**

**अ.नि १ -** मी सक्रियपणे ऐकण्याचे कौशल्य वापरतो का? आणि माझ्या गरजा स्पष्टपणे सांगतो का?.

**क्षमता २ - अस्खलितपणे संभाषण करणे आणि अर्थपूर्ण संभाषण करणे.**

**अ.नि २ -** दुसऱ्याशी संवाद साधताना माझ्या शारिरीक हालचाली व चेहऱ्यावरील हावभाव उचित दाखवतो का?.

**क्षमता ३ - क्लिष्ट कार्य पूर्ण करण्यासाठी मौखिक सूचना समजून घेणे व इतरांना तशाच स्पष्ट तोंडी सूचना देतो.**

**अ.नि ३ -** मला एक किंवा दोन तोंडी सूचना समजतात का?.

## संभाषण - बोलणे



**क्षमता १ - अस्खलितपणे संभाषण करणे आणि अर्थपूर्ण संभाषण करणे.**

**अ.नि १ -** मी संवादात, गोष्टींमध्ये भाग घेतो का? आणि नुकतेच आलेले अनुभव सांगू शकतो का?

| माझा भाषा विकास - प्राणिक विकास<br>Language and literacy Development | पायाभूत टप्पा १<br>वयोगट ३-४ वर्षे |
|---|---|

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

## संभाषण - बोलणे





**क्षमता २ - स्वतःहून साधी गाणी आणि कविता तयार करणे.**

**अ.नि २ -** मला छोट्या कविता, गाणी म्हणता येतात का? तसेच मी संगीत व तालावरच्या कृतीत सहभागी होतो का?.

**क्षमता ३ - अस्खलितपणे संभाषण करणे आणि अर्थपूर्ण संभाषण करणे.**

**अ.नि ३ -** काय आणि का चे अनेक प्रश्न विचारतो का?.

**क्षमता ४ - (प्रकटवाचन ऐकणे आणि शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे). स्वतःहून पात्रांची ओळख, कथाबीज व लेखकाला जे सांगायचे आहे ते समजून कथा वाचणे व त्याचा अर्थ समजून घेणे.**

**अ.नि ४ -** मी वयानुसार छोट्या गोष्टींची गंमत घेतो का? त्यावरुन विचारलेल्या सोप्या प्रश्नांची उत्तरे देऊन प्रतिसाद देतो का?



**क्षमता ५ - ★ शब्दध्वनीची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे शब्दात गुंफणे.**
**★ शब्दांपासून शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करणे.**

**अ.नि ५ -** परिसरातील आवाज ओळखतो का?
(जसे प्राण्यांचे, पक्ष्यांचे आवाज)
तसेच यमक शब्द ओळखतो का?

**क्षमता ६ - दैनंदिन संवाद परिणामकारकरित्या साधण्यासाठी योग्य ते शब्द वापरणे.**

**अ.नि ६ -** मी गुड मॉर्निंग, वेलकम, थँक्यू इत्यादी इंग्रजी शब्द सहजपणे वापरतो का?

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

## संभाषण - बोलणे



**क्षमता ७ - दैनंदिन संवाद परिणामकारकरित्या साधण्यासाठी पुरेसे शब्द आत्मसात करणे व आत्मसात केलल्या शब्दसंग्रहाचा वापर करुन नवीन शब्दांचे अर्थ लावणे.**

**अ.नि ७ -** नेहमीच्या व ओळखीच्या चित्र आणि वस्तूंबाबत अचूक शब्दसंपत्ती वापरतो का? (उदा. स्वतःचे नाव सांगतो / सांगते, मित्रांची नावे सांगतो नेहमीच्या वस्तू आणि चित्रांची नावे सांगतो.)

## वाचन - अंकुरती साक्षरता



**क्षमता १ - पुस्तकांची मूलभूत रचना/स्वरुप, मुद्रित अक्षरांची कल्पना ओळखणे, मुद्रित झालेल्या मजकुराची दिशा समजून घेणे व पुस्तकातील प्राथमिक विरामचिन्हे ओळखणे.**

**अ.नि १ -** वर्गात किंवा घरी छापिल नावांबाबत सजगता दाखवतो का? जसे आवडीच्या बिस्किटे, चॉकलेट यांच्या आवरणावरुन ओळखतो.

**क्षमता २ - मातृभाषा लिपितील सर्व अक्षरे व अवयव ओळखणे आणि या ज्ञानाचा उपयोग शब्द वाचन-लेखनासाठी करणे. (नियमित वापरातील नामे साईटवर्ड म्हणून ओळखणे).**

**अ.नि २ -** मला स्वतःचे लिहिलेले नाव (ओळखीच्या लिपीतील) ओळखता येते का? (थोडी मदत देऊन).

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

## वाचन - अंकुरती साक्षरता



**क्षमता ३ - ★ पुस्तकांची मूलभूत रचना/स्वरुप, मुद्रित अक्षरांची कल्पना ओळखणे, मुद्रित झालेल्या मजकुराची दिशा समजून घेणे व पुस्तकातील प्राथमिक विरामचिन्हे ओळखणे.**
**★ स्वत:हून पात्रांची ओळख, कथाबीज व लेखकाला जे सांगायचे आहे ते समजून कथा वाचणे व त्याचा अर्थ समजून घेणे.**
**अ.नि ३ -** मी परिचयाच्या गोष्टीच्या पुस्तकातील चित्रांवरुन गोष्टी सांगतो का?



**क्षमता ४ - पुस्तकांची मूलभूत रचना/स्वरुप, मुद्रित अक्षरांची कल्पना ओळखणे, मुद्रित झालेल्या मजकुराची दिशा समजून घेणे व पुस्तकातील प्राथमिक विरामचिन्हे ओळखणे.**
**अ.नि ४ -** मी पुस्तक नीट हाताळतो का?
(उदा.पुढचे पान, मागचे पान कळते).
वयानुसार योग्य अशी गोष्टीची पुस्तके, चित्र पुस्तके, कविता पुस्तके, मुळाक्षरांची पुस्तके, गाण्याची पुस्तके अशा विविध प्रकारच्या पुस्तकांचे अन्वेषण करतो का?

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (Competencies and Learning Outcomes)

# लेखन - अंकुरती साक्षरता



**क्षमता १ - विविध प्रकारचे साहित्य व साधने हाताळणे व त्याबरोबर खेळणे.**

**अ.नि १ -** वेगवेगळे साहित्य शोधून काढतो का?
(जसे प्लॅस्टिक, स्पंज, मॅग्नेट, फोम)
तसेच मोठे व जाड रंगवायचे आणि गिरगिटवायचे
(जे धरायला सोपे असते) साहित्य शोधून काढतो का?.



**क्षमता २ - विविध प्रकारचे साहित्य व साधने हाताळणे व त्याबरोबर खेळणे.**

**अ.नि २ -** गिरगिटवणे, ठसेकाम, बोटांनी रंगविणे
या कृती करतो का? तसेच मोठे खडू,
मार्कर, ब्रश यांचा वापर करतो का?.



**क्षमता ३ - स्वतःला समजलेल्या गोष्टी सांगण्यासाठी व स्वतःचे अनुभव व्यक्त करण्यासाठी लेखन करणे.**

**अ.नि ३ -** डावीकडून उजवीकडे गिरगिटवण्याच्या स्वरुपात
काही समान आकारातील लेखन पानावर करतो का?
त्यातून माझा सूक्ष्म स्नायूविकास झाल्याचा दिसून येतो का?

| माझा भाषा विकास - प्राणिक विकास<br>Language and literacy Development | पायाभूत टप्पा २<br>वयोगट ४-५ वर्षे |
|---|---|

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

## श्रवण - ऐकणे



**क्षमता १ - अस्खलितपणे संभाषण करणे, अर्थपूर्ण संभाषण करणे.**
**अ.नि १** - दुसऱ्याचे बोलणे व्यवस्थित ऐकून त्यावर प्रतिसादही देतो का?.

**क्षमता २ - कार्य पूर्ण करण्यासाठी मौखिक सूचना समजून घेणे.**
**अ.नि २** - तोंडी सूचनांचे पालन करतो का?.

## संभाषण - बोलणे



**क्षमता १ - अस्खलितपणे संभाषण करणे, अर्थपूर्ण संभाषण करणे.**
**अ.नि १** - प्रत्यक्ष बोलून किंवा न बोलता आपल्या गरजा सांगतो का?.

**क्षमता २ - अस्खलितपणे संभाषण करणे, अर्थपूर्ण संभाषण करणे.**
**अ.नि २** - संवादात सक्रियपणे भाग घेऊन आपली आवडनिवड सांगतो का?



**क्षमता ३ - स्वतःहून साधी गाणी/कविता तयार करणे.**
**अ.नि ३** - तालबध्द कृतींमध्ये भाग घेतो का?
छोटी गाणी, अभिनय गीते म्हणतो का?

| माझा भाषा विकास - प्राणिक विकास<br>Language and literacy Development | पायाभूत टप्पा २<br>वयोगट ४-५ वर्षे |
|---|---|

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

# संभाषण - बोलणे

**क्षमता ४ - दैनंदिन संवाद परिणामकारकरित्या साधण्यासाठी पुरेसे शब्द आत्मसात करणे व आत्मसात केलल्या शब्दसंग्रहाचा वापर करुन नवीन शब्दांचा अर्थ लावणे.**



**अ.नि ४ -** माझी शब्दसंपत्ती वाढल्याचे जाणवते का ? तसेच मी नवे काही शिकण्यात रस दाखवतो का ?

**क्षमता ५ - अस्खलितपणे संभाषण करणे, अर्थपूर्ण संभाषण करणे.**



**अ.नि ५ -** कृती करताना किंवा संवादात प्रश्न विचारुन योग्य उत्तरे देतो का ?.

**क्षमता ६ - शब्दध्वनीची जाणीव होवून शब्दध्वनी/अक्षरे शब्दात गुंफणे.**

**अ.नि ६ -** मला यमक शब्द आठवतात का ? आणि त्याची मजा घेतो का ?

**क्षमता ७ - दैनंदिन संवाद परिणामकारकरित्या साधण्यासाठी योग्य ते शब्द वापरणे.**

**अ.नि ७ -** मी रोजच्या वापरातील इंग्रजी शब्द, शुभेच्छा आणि अभिव्यक्तीचे सभ्यप्रकार वापरतो का ? तसेच इंग्रजीत किंवा मातृभाषेत प्रतिसाद देतो का ?

| माझा भाषा विकास - प्राणिक विकास<br>Language and literacy Development | पायाभूत टप्पा २<br>वयोगट ४-५ वर्षे |
|---|---|

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

## वाचन - अंकुरती साक्षरता



**क्षमता १ - ★ पुस्तकांची मूलभूत रचना/स्वरुप, मुद्रित अक्षरांची कल्पना ओळखणे.**
**★ वाचन दिशा, विरामचिन्हे ओळखणे.**

**अ.नि १ -** आजूबाजूच्या परिसरातील चिन्ह, प्रतिके आणि नाव वाचतो का?





**क्षमता २ - कथन केलेल्या किंवा वाचलेल्या गोष्टी समजून घेणे आणि त्यातील पात्रे, गोष्टीची मध्यवर्ती कल्पना आणि लेखकाला काय सांगायचे आहे ते लक्षात घेणे.**

**अ.नि २ -** छोटी गोष्ट नीट अनुक्रमाने सांगतो का? व त्यातील महत्त्वाच्या घटना नाटयीकरणाने दाखवतो का?



**क्षमता ३ - कथन केलेल्या किंवा वाचलेल्या गोष्टी समजून घेणे आणि त्यातील पात्रे, गोष्टीची मध्यवर्ती कल्पना आणि लेखकाला काय सांगायचे आहे ते लक्षात घेणे.**

**अ.नि ३ -** स्वत:ची गोष्ट स्वत:च्या शब्दात तयार करतो का?

**क्षमता ४ - ★ पुस्तकांची मूलभूत रचना/स्वरुप, मद्रित अक्षरांची कल्पना ओळखणे.**
**★ वाचन दिशा, विरामचिन्हे ओळखणे.**



**अ.नि ४ -** माझ्यात वाचनासाठीच्या आवश्यक बाबींची जाणीव दिसते का? जसे वरुन-खाली, डावीकडून-उजवीकडे वाचणे, तसेच शब्दांना अर्थ असतो हे मला समजते का?

| माझा भाषा विकास - प्राणिक विकास<br>Language and literacy Development | पायाभूत टप्पा २<br>वयोगट ४-५ वर्षे |
|---|---|

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

## वाचन - अंकुरती साक्षरता



**क्षमता ५ -★ पुस्तकांची मूलभूत रचना/स्वरुप, मुद्रित अक्षरांची कल्पना ओळखणे.**

**★ वाचन दिशा, विरामचिन्हे ओळखणे.**

**अ.नि ५ -** पुस्तकाची पाने उलटून स्वतःचे स्वतः वाचन करण्याचा अभिनय करतो का?

## अक्षर ओळख

**क्षमता १ - शब्दांपासून शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करणे.**

**अ.नि १ -** शब्दातील अक्षरांनुसार टाळ्या वाजवू शकतो का? (मदतीने)

**क्षमता २ - ★ शब्दध्वनीची जाणीव होवून शब्दध्वनी/अक्षरे शब्दात गुंफणे.**

**★ शब्दांपासून शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करणे.**

**अ.नि २ -** मला नेहमीच्या व ओळखीच्या शब्दांचे सुरुवातीचे ध्वनी ओळखता येतात का?.

**क्षमता ३ - ★ शब्दध्वनीची जाणीव होवून शब्दध्वनी/अक्षरे शब्दात गुंफणे.**

**★ शब्दांपासून शब्दध्वनी/अक्षरे वेगळी करणे.**

**अ.नि ३ -** काही अक्षरे व त्यांचे ध्वनी ओळखू शकतो का?.

| माझा भाषा विकास - प्राणिक विकास<br>Language and literacy Development | पायाभूत टप्पा २<br>वयोगट ४-५ वर्षे |
|---|---|

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

## लेखन - अंकुरती साक्षरता

**क्षमता १ - विविध प्रकारचे साहित्य व साधने हाताळणे व त्याबरोबर खेळणे.**

**अ.नि १ -** इतरांबरोबर उद्योन्मुख लेखन व चित्र काढण्यात मजा घेतो का?

**क्षमता २ - विविध प्रकारचे साहित्य व साधने हाताळणे व त्याबरोबर खेळणे.**

**अ.नि २ -** योग्य लेखन व रंग साधनांमध्ये स्वारस्य दाखवतो का?





**क्षमता ३ - ★ कलेच्या माध्यमातून स्वतःच्या कल्पना आणि भावना व्यक्त करण्यासाठी सर्जनशीलता व कल्पकतेचे काम करणे.**

**★ स्वतःला समजलेल्या गोष्टी सांगण्यासाठी व स्वतःचे अनुभव व्यक्त करण्यासाठी लेखन करणे.**

**अ.नि ३ -** मी खूणा किंवा चित्र काढून एखादी कल्पना व्यक्त करतो का? आणि त्याचे वर्णन करतो का?





| माझा भाषा विकास - प्राणिक विकास<br>Language and literacy Development | पायाभूत टप्पा ३<br>वयोगट ५-६ वर्षे |
| --- | --- |

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

## श्रवण - ऐकणे

**क्षमता १ - अस्खलितपणे संभाषण करणे आणि अर्थपूर्ण संभाषण करणे.**

**अ.नि १ -** मी दुसऱ्याचे बोलणे व्यवस्थित ऐकून त्यावर प्रतिसाद देतो का? तसेच माझी बोलण्याची वेळ येईपर्यंत थांबतो का?



**क्षमता २ - क्लिष्ट कार्य पूर्ण करण्यासाठी मौखिक सूचना समजून देणे व इतरांना तशाच स्पष्ट तोंडी सूचना देणे.**

**अ.नि २ -** गुंतागुंतीच्या सूचना मला समजतात का? व मी त्याचे पालन करतो का?.



## संभाषण - बोलणे

**क्षमता १ - अस्खलितपणे संभाषण करणे आणि अर्थपूर्ण संभाषण करणे.**

**अ.नि १ -** मी पूर्ण वाक्यात बोलतो ? माझ्या गरजा सांगतो का? आणि विचार मांडतो का?

**क्षमता २ - अस्खलितपणे संभाषण करणे आणि अर्थपूर्ण संभाषण करणे.**

**अ.नि २ -** संवादात सक्रियपणे आवश्यकतेनुसार आळीपाळीने भाग घेतो का? व आपल्या अनुभवांची तपशीलासह व कारणांसह अनुक्रमात मांडणी करतो का? आपली आवडनिवड सांगतो का?



| माझा भाषा विकास - प्राणिक विकास<br>Language and literacy Development | पायाभूत टप्पा ३<br>वयोगट ५-६ वर्षे |
|---|---|

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

## संभाषण - बोलणे



**क्षमता ३ - स्वतःहून साधी गाणी कविता तयार करणे.**

**अ.नि ३ -** मी तालबध्द कृतींमध्ये भाग घेतो का? मोठ्ठी गाणी म्हणतो का? मला कविता, गोष्टी अर्थासहित माहिती असतात का?



**क्षमता ४ - अस्खलितपणे संभाषण करणे आणि अर्थपूर्ण संभाषण करणे.**

**अ.नि ४ -** माहिती मिळवण्यासाठी मी प्रश्न विचारतो का? आणि माहिती देण्यासाठी उत्तरे देतो का?

**क्षमता ५ - दैनंदिन संवाद परिणामकारकरित्या साधण्यासाठी पुरेसे शब्द आत्मसात करणे व आत्मसात केलेल्या शब्दसंग्रहाचा वापर करुन नवीन शब्दांचा अर्थ लावणे.**

**अ.नि ५ -** माझी शब्दसंपत्ती आणखी वाढल्याचे जाणवते का? तसेच नवे शिकण्यात मी रस दाखवतो का?

**क्षमता ६ - कथन केलेल्या गोष्टी समजून घेणे व त्यातील पात्रे, गोष्टीची मध्यवर्ती कल्पना आणि लेखकाला काय सांगायचे आहे ते लक्षात घेणे.**

**अ.नि ६ -** मी एखादी गोष्ट छान क्रमाने सांगू शकतो का? व गुंतागुंतीच्या प्रश्नांना उत्तरे देऊ शकतो का?.

**क्षमता ७ - शब्दध्वनींची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे शब्दात गुंफणे आणि शब्दापासून शब्दध्वनी अक्षरे वेगळी करणे.**

**अ.नि ७ -** मी शब्दांशी खेळू शकतो का? यमक जुळणाऱ्या शब्दांची पुढची श्रृंखला तयार करु शकतो का?

| माझा भाषा विकास - प्राणिक विकास<br>Language and literacy Development | पायाभूत टप्पा ३<br>वयोगट ५-६ वर्षे |
|---|---|

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

## वाचन - अंकुरती साक्षरता



**क्षमता १ - पुस्तकाची मुलभूत रचना/संवाद/मुद्रित अक्षरांची कल्पना ओळखणे/वाचनदिशा आणि विरामचिन्हे ओळखणे.**

**अ.नि १ -** सातत्याने वापरातील शब्द तसेच नेहमीच्या वाचनातील गोष्टीमधील चित्र ओळखतो का किंवा दाखवतो का ?

**क्षमता २ - मुद्रित साहित्यातून माहिती मिळते असे वर्णन करणे.**

**अ.नि २ -** लिखित शब्दांना अर्थ असतो याची जाणीव आहे हे दर्शवतो का ?



**क्षमता ३ - पुस्तकाची मुलभूत रचना/संवाद/मुद्रित अक्षरांची कल्पना ओळखणे/वाचनदिशा आणि विरामचिन्हे ओळखणे.**

**अ.नि ३ -** गोष्टीच्या पुस्तकातील किंवा एखाद्या माहितीच्या पुस्तकातील चित्रांवरुन व छापिल मजकुरावरुन त्याबद्दलचा अंदाज बांधू शकतो का ?

## अक्षर ओळख



**क्षमता १ - शब्दध्वनींची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे शब्दात गुंफणे आणि शब्दापासून शब्दध्वनी अक्षरे वेगळी करणे.**

**अ.नि १ -** मी शब्दांचे सुरुवातीचे व शेवटच्या अक्षराचे ध्वनी ओळखतो का ?

**क्षमता २ - शब्दध्वनींची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे शब्दात गुंफणे आणि शब्दापासून शब्दध्वनी अक्षरे वेगळी करणे.**

**अ.नि २ -** शब्दातील अक्षरांनुसार टाळ्या वाजवू शकतो का ?

| माझा भाषा विकास - प्राणिक विकास<br>Language and literacy Development | पायाभूत टप्पा ३<br>वयोगट ५-६ वर्षे |
|---|---|

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

## अक्षर ओळख

**क्षमता ३ - शब्दध्वनींची जाणीव होऊन शब्दध्वनी/अक्षरे शब्दात गुंफणे आणि शब्दापासून शब्दध्वनी अक्षरे वेगळी करणे.**

**अ.नि ३ -** अनेक अक्षरे व त्यांचे ध्वनी ओळखू शकतो तसेच शब्दांतील अक्षराची फोड करण्याचा प्रयत्न करतो का?

**क्षमता ४ - ★ परिचित शब्द तयार करण्यासाठी ध्वनी जोडणे (स्वर व व्यंजन).**
**★ सर्व अक्षरे व अवयव ओळखणे आणि या ज्ञानाचा उपयोग सर्व वाचन व लेखनासाठी करणे.**

**अ.नि ४ -** मी मुळाक्षरे व व्यंजने वापरुन स्वतःचे शब्द तयार करतो का?

## लेखन - अंकुरती साक्षरता

**क्षमता १ - सर्व अक्षरे व अवयव ओळखणे आणि या ज्ञानाचा उपयोग सर्व वाचन व लेखनासाठी करणे.**

**अ.नि १ -** मी अनेक शब्द स्वतंत्रपणे तयार करतो का? आणि तयार केलेले शब्द लिहिण्यासाठी ध्वनी चिन्हांचा वापर करतो का?

**अ.नि १.१** चित्र किंवा खूणा काढून ते काय आहे ते लिहू शकणे आणि ती कल्पना किंवा त्याचे वर्णन करु शकणे.

**अ.नि १.२** स्वलेखन करणे त्यात काही प्रमाणात अक्षरे असणे.

**अ.नि १.३** वर्ग वातावणातील लिहिलेले शब्द, वाक्य बघून लिहिण्याचा प्रयत्न करणे.

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (Competencies and Learning Outcomes)

## लेखन - अंकुरती साक्षरता



**अ.नि १.४** प्रसंग किंवा अनुभव दर्शवणारे चित्र काढू शकणे व त्यातील ठळक गोष्टींची नावे लिहीणे.(स्वलेखन किंवा प्रमाणित)

**अ.नि १.५** योग्य साधनांचा वापर करुन लादी, फळा, कागद, भिंत यावर चित्र काढणे.



**अ.नि १.६** लिहिण्याकरीता, चित्र काढण्याकरीता, रंगविण्याकरीता साधने धरताना अंगठा व चाफेकळीमधे पकड आहे हे जाणवणे.



**अ.नि १.७** अक्षरचक्र तयार करताना त्या त्या अक्षराची वेगवेगळी चित्रे काढून त्यांची नावे लिहिणे.

**माझा कलात्मक आणि सांस्कृतिक विकास - आनंदमय कोश - Asthetic Development**

⬇

**रा.अ.आ - 2022 - CGs**

**अभ्यासक्रमाची ध्येये**

**CG - 12 बालके दृक् आणि ललित कलांमध्ये आपली क्षमता आणि संवेदनशीलता विकसित करतात आणि त्यांच्या भावना अर्थपूर्ण आणि आनंददायक मार्गांनी कलेद्वारे व्यक्त करतात.**

⬇

**निपुण विकासात्मक ध्येये - DGs**

**विकासात्मक ध्येय १ - DG2 - मुलं उत्तम संवादक व्हावीत.**

यानुसार

**कलात्मक आणि सांस्कृतिक विकास क्षेत्रातील** माझ्यामध्ये अपेक्षित **क्षमता** आणि त्या क्षमता पडताळणीच्या **वयानुसार अपेक्षित अध्ययन निष्पत्ती** पहा...

**माझा कलात्मक आणि सांस्कृतिक विकास -**
**आनंदमय कोश - Asthetic Development**

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

## पायाभूत टप्पा १ - वयोगट ३-४ वर्षे

**क्षमता १ - विशिष्ठ कृती करताना ज्ञानेंद्रियांच्या संवेदना व शारिरीक हालचाली यामध्ये समन्वय दर्शविणे.**

**अ.नि १ -** नृत्य, संगीत, कलात्मक कृतीत सहभागी होतो का? त्यात अन्वेषण करतो का?



## पायाभूत टप्पा २ - वयोगट ४-५ वर्षे

**क्षमता १ - विशिष्ठ कृती करताना ज्ञानेंद्रियांच्या संवेदना, क्षमता व शारिरीक हालचाली यामध्ये समन्वय दर्शविणे.**

**अ.नि १ -** नृत्य, संगीत, कलात्मक कृतीत सहभागी होतो का? आणि त्याचे अन्वेषण करतो का?



## माझा कलात्मक आणि सांस्कृतिक विकास - आनंदमय कोश - Asthetic Development

क्षमता आणि अध्ययन निष्पत्ती (अ.नि) - (**Competencies and Learning Outcomes**)

# पायाभूत टप्पा ३ - वयोगट ५-६ वर्षे

**क्षमता १ - ★ विशिष्ट कृती करताना ज्ञानेंद्रियांच्या संवेदना व शारीरिक हालचाली यांत समन्वय दर्शविणे.**

**★ विविध शारीरिक कृतींमध्ये तोल, समन्वय आणि लवचिकता दर्शवणे.**

**अ.नि १ -** संगीत आणि हालचालीयुक्त कृतींमध्ये सक्रियतेने सहभागी होतो का ? आणि त्यात सृजनात्मकता दाखवतो का ? तसेच उपलब्ध जागेचे नीट अन्वेषण करतो का ?



**अशाप्रकारे आपण राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ला अपेक्षित मार्गाने मुलांचा पंचकोश विकास साध्य करत आहोत.**





बालकांना हसू द्या, खेळू द्या.
हसत, खेळत शिकू द्या.
गाऊ द्या, नाचू द्या
गाता, नाचता शिकू द्या.
तोडू द्या, जोडू द्या
तोडत, जोडत शिकू द्या.
नाना प्रश्न विचारु द्या
प्रश्न विचारत विचारत शिकू द्या.

**- पद्‌मभूषण ताराबाई मोडक**



लहान वयात आपण ज्या पध्दतींचा शिकताना उपयोग करतो, त्यावरूनच आपण मोठेपणी कोणत्या पध्दतीने शिकत राहू ते ठरत असते. जी मुले बालपणी कोणत्याही प्रलोभनाविना वा शिक्षेविना आपल्याच कृतीद्धारे शिकतात, तीच मुले मोठेपणी स्वतंत्र बाण्याची आणि उत्स्फूर्तपणे स्वयंशिक्षण करणारी अशी घडतात.

**- मादाम मारिआ मॉंटेसरी**



मासे पोहतात, पक्षी उडतात तितक्याच नैसर्गिकपणे माणूस विचार करतो आणि शिकतो. म्हणून मुलांना शिकण्यासाठी कोणी प्रवृत्त करण्याची गरज नाही. आपण फक्त एवढंच करायला हवं की, जितकं शक्य आहे तितकं बाहेरचं जग शाळेत आणायला हवं. जेव्हा मुलं मागतील फक्त तेव्हाच त्यांना सल्ला द्यायला हवा, मुलांना जेव्हा तुमच्याशी बोलावंसं वाटेल तेव्हा त्यांचं आदराने ऐकायला हवं आणि त्यांच्या वाटेतून बाजूला व्हायला हवं. बाकी सगळं त्यांचे ते छानच करतील यावर विश्वास ठेवावा.

**-जॉन होल्ट**

# मित्र मैत्रिणींनो हे समजून घेऊया!

★ तीन वर्षांचे मूल हे एक संपूर्ण माणूस म्हणून घडले आहे याची जाणीव ठेवूया.

★ त्याच्या या वयाला त्याने आपल्या आपण अनेक गोष्टी आत्मसात केल्या आहेत हे मान्य करुया.

★ आपणच त्याचे कर्ताकरविता आहोत या विचारापासून दूर होऊया.

★ मुलांवर पूर्ण विश्वास ठेवूया.

★ त्यांच्या कृतीतून तो सतत आपल्या आजूबाजूच्या परिस्थितीबद्दल शिकत आहे हे समजूया.

★ त्यांना सतत 'नाही , 'नको  या शब्दांपासून दूर ठेवूया.

★ त्यांच्याशी नीट संवाद साधला तर ते छान समजून घेतात हे आपण समजून घेऊया.

★ पालकसभांना उपस्थित राहून शाळेतील खेळपध्द्ती समजावून घेऊया.

★ मुलांच्या खेळातच अभ्यास सामावलेला असतो हे जाणून घेऊया.

★ कोणत्याही प्रकारची सक्ती अथवा धाक न दाखवता सर्व गोष्टी लीलया त्यांना समजतील यासाठी प्रयत्न करुया.

★ मुलांना बोलू देऊया , त्यांच्याशी संवाद साधूया,  सूचनांचा भडीमार टाळूया.

★ लेखन व वाचन म्हणजे शिक्षण नाही, त्यामुळे अंक, अक्षरे यांच्या लेखनाची किंवा शिकवण्याची घाई करायला नको हे समजून घेऊया.

★ मुलांना कुठल्याही शिकवणी वर्गास घातले तर त्यांची विचारशक्ती खुरडेल हे जाणूया.

★ इंग्रजी शिकवणी वर्गांना घालू नका, कुठलीही भाषा आत्मसात करण्याची लहान मुलांची शक्ती अफाट असते, पण ती भाषा अभ्यास म्हणून शिकवली गेली तर त्याचा सकारात्मक परिणाम होत नाही हे समजून घेऊया.

★ एक शाळा, पालक व समाज यांच्या समन्वयातून मुलांचं एक सक्षम व्यक्तिमत्त्व घडत जातं हे समजून शाळेच्या मुलांसाठीच्या उपक्रमात सहभागी होऊया.

**'हासती मुले जिथे देश तो महान'  हे आपलं ब्रीदवाक्य तर 'आनंदी ठेवू मुले' हे आपले ध्येय आहे. त्यामुळे आपण सगळे मिळून आपल्या मुलांसाठी भरीव काम करुया. त्यांना आनंदी ठेऊया.**

धन्यवाद.

श्रीमती रती भोसेकर

मुख्याध्यापिका

# साधनांचे गंमत गाणे

या रे सारे, या रे या ।
साधनांतूनी शिकू चला।
गोष्टींसाठी चित्र हवे, शब्द शिकूया नवे नवे
फळाफुलांची चित्रे पाहू, कोणकोणती जाणून घेऊ

तो, ती, ते चा लावा मेळ, चला खेळू या व्याकरण खेळ
खोदफळे अन् रेतीअक्षरे चला गिरवूनी पाहू बरे।
गणनसंकल्पना ओळखू चला, लहान-मोठा चला शिका
अंक नव्हे हे चित्र खरे, पाहून लक्षात ठेवू सारे

रेती अंक गिरवून पाहू, आकार त्याचा समजून घेऊ
सळीपेटीचा खेळ मजेचा, सळया मोजून अंक म्हणायचा
वजाबाकी अन् बेरीजपाटी, सोपी केली तुमच्यासाठी
शून्य आणि दशक संकल्पना, एकास एक संगती पहा

विज्ञानाची मजाच न्यारी, प्रयोग पाहण्या आवडतो भारी
रंग, चव आणिक वास, ओळखा पाहू तुम्ही खास !
जीवन व्यवहार नावातच सारं, रोजच्या जीवनातला कसा व्यवहार
चित्रे पाहूनी गाणे गाऊ, खंजिरीने ताल देऊ

कागद फाडा, कागद कापा, होडी, पतंग सारेच शिका
आवडतो ना खेळ खेळायला ? झोपाळयांवरही झुलायला ?
बसा सायकलवर आणि घोडयावर
चालून बघा नागमोडी रेषेवर

सगळी साधने खेळायची
रोजच आपण वापरायची
साधनांमधून शिकायचे
मोठया शाळेत जायचे !

- संग्रहित










# आमचा घराघरातील काको (कामाचा कोपरा)















सजावट व निर्मिती : (अपूर्वा आर्टस्) ९९६९०००४७२